


# पार्श्वभूमी

रियांश एन्टरप्राईजेस
नामांकित कंपनीचे LED टी.व्ही.
50% पर्यंतच्या सवलती दरात मिळतील
पत्ता : शॉप नं.92 व 93 सारडा सेंट्रल, डी.पी.रोड,बीड.
Mob.9511511818

बीड वर्ष ३६ वे अंक ८२ वा फोन २३०१०१ दिनांक १९ फेब्रुवारी २०२६ गुरुवार
गंमत भंडारी
ई-पेपर : www.parshvbhumi.com
Reg.No.L/85/RNP/Beed/2020-22 RNI Regd.no. MAHMAR/1990/501
पाने ६ किंमत ४रु.

# मुस्लिम समाजाला दिलेले ५% आरक्षण रद्द केले जात वितरण प्रमाणपत्रालाही सरकारकडून ब्रेक

**बीड दि.१८ (प्रतिनिधी):- तत्कालीन सरकारने २३ डिसेंबर २०१४ रोजी मुस्लिम समाजाला देण्यात आलेले ५% आरक्षण रद्द केल्याचा शासन निर्णय जारी केला आहे. आरक्षण रद्द झाल्यानंतर राबविली जाणारी जात प्रमाणपत्र वितरण आणि वैधता प्रक्रियेलाही शासनाकडून ब्रेक लावण्यात आलेला आहे. तत्कालीन मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांच्या मंत्री मंडळाने हे ५% आरक्षण देण्याचा निर्णय घेतलेला होता.**

मुस्लीम समाजाला देण्यात आलेल्या आरक्षणासंदर्भात महत्वाची बातमी समोर आली आहे. मुस्लीम समाजाला देण्यात आलेलं ५ टक्के आरक्षण रद्द करण्यात आलं आहे. मुस्लिम समाजासाठी राबवण्यात येणाऱ्या जात प्रमाणपत्र प्रक्रियेला ब्रेक लावण्यात आला आहे. काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेस आघाडी सरकारने दिलेल्या आरक्षणानंतर प्रक्रिया सुरू करण्यात आली होती. पण आता राज्य शासनाकडून सुधारित शासन निर्णय प्रकाशित करण्यात आला आहे. आरक्षणाचा शासनादेश आणि परिपत्रक जारी करण्यात आलं असून, त्यात आरक्षण रद्द करण्यात आल्याची माहिती देण्यात आली आहे. शासन निर्णयात मुस्लिम समाजाला देण्यात आलेले २३ डिसेंबर २०१४ रोजीचे आरक्षण रद्द झाल्याचा उल्लेख करण्यात आला आहे. आरक्षण रद्द झाल्यानंतरही राबवली जाणारी जात प्रमाणपत्र वितरण आणि वैधता प्रक्रियेला शासनाकडून ब्रेक लावण्यात आला आहे.

लोकसभा निवडणुकीत दारुण पराभव झाल्यानंतर, आगामी विधानसभा निवडणुकांकडे लक्ष ठेवून असलेल्या महाराष्ट्र सरकारने मराठा आणि मुस्लिम आरक्षणासंदर्भात निर्णय घेतला होता. सरकारने सरकारी नोकऱ्या आणि शैक्षणिक




संस्थांमध्ये मराठ्यांना १६ टक्के आणि मुस्लिमांना ५ टक्के आरक्षण जाहीर केले होते. यामुळे राज्यातील एकूण आरक्षण ७३ टक्के झाले होते. राज्याचे अल्पसंख्याक कल्याण मंत्री नसीम खान यांनी मंत्रिमंडळाच्या बैठकीत मुस्लिम समुदायासाठी ५ टक्के आरक्षणाचा प्रस्ताव मांडला होता. कोणत्याही चर्चेशिवाय एकमताने हा प्रस्ताव मंजूर करण्यात आला होता.

अध्यादेशात नेमकं काय म्हटलंय? सामाजिक शैक्षणिकदृष्ट्या मागासलेल्या मुस्लिम गटासाठी विशेष मागास पान २ वर

### अध्यादेशातील महत्त्वाचे मुद्दे:

**आरक्षणाचे स्वरूप:** शासकीय व निमशासकीय सरळसेवा भरती आणि शैक्षणिक संस्थांमधील प्रवेशासाठी मुस्लीम समाजाला 'विशेष मागास प्रवर्ग-अ' अंतर्गत ५ टक्के आरक्षण देण्यात आले होते.

**कागदपत्रे अवैध:** या आरक्षणानुसार आतापर्यंत दिले जाणारे जातीचे दाखले आणि जात वैधता प्रमाणपत्रे देण्याची प्रक्रिया थांबवण्यात आली असून, यापूर्वीचे संबंधित शासन निर्णय रद्द करण्यात आले आहेत.

**प्रशासकीय बदल:** सामान्य प्रशासन विभाग आणि अल्पसंख्याक विकास विभागाने यापूर्वी निर्गमित केलेले वाचा क्र. १ ते ५ मधील सर्व शासन निर्णय आणि परिपत्रके आता अकार्यान्वित ठरवण्यात आली आहेत.

## संत भगवानबाबा प्रतिष्ठान परिसरातील हिंदू स्मशानभूमीला मिळाले अधिकृत पी.आर.कार्ड

### जिल्हाप्रमुख सचिन मुळूक यांच्या पाठपुराव्यामुळे स्मशानभूमीची ३ एकर ६ गुंठे जागा वाचली



बीड दि.१८ (प्रतिनिधी):- शहरातील संत भगवानबाबा प्रतिष्ठाण परिसरातील हिंदू स्मशानभूमीवर काही समाजकंटकांकडून अतिक्रमण करण्यात येत होते. मात्र शिवेसना जिल्हाप्रमुख सचिन मुळूक यांनी हे प्रकरण पोलीस आणि प्रशासनासमोर आणून समाजकंटकांचा डाव हाणून पाडला. दरम्यान जिल्हाप्रमुख मुळूक यांनी नगरपालिका प्रशासन व भूमिअभिलेख कार्यालयाकडे दीड वर्ष कागदपत्रांची लढाई केल्यानंतर अखेर अधिकृत शासकीय मोजणी होऊन हिंदू स्मशानभूमीला अधिकृत ३ एकर ६ गुंठ्याचे (१२६०० चौ. मि.) पीआर कार्ड मिळाले आहे. दरम्यान शिवसेना जिल्हाप्रमुख सचिन मुळूक यांनी बुधवारी (दि.१८) मुख्याधिकारी शैलेश फडसे यांच्याकडे पान २ वर

## अखेर एकाही बिअर बारला परवानगी दिली नाही -ॲड.अजित देशमुख

बीड दि.१८ (प्रतिनिधी):- बीड जिल्ह्यात अधिकृत नोंदणी असलेली जवळपास साडेबाराशे बियर बार, बिअर शॉपी, देशी दारू आणि होलसेल दारू विक्रीची दुकाने आहेत. अशा परिस्थितीत सामाजिक स्वास्थ्य



बिघडवायचे नसेल तर नवीन दारू दुकानांना परवानगी देऊ नका, अशी मागणी करण्यात आल्या नंतर आजच्या बैठकीमध्ये एकाही बिअर बारला मंजुरी दिली नसल्याची माहिती ज्येष्ठ समाजसेवक मा. अण्णा हजारे प्रणित भ्रष्टाचार विरोधी जन आंदोलनाचे विश्वस्त तथा स्वराज्य जनजागृती परिषदेचे अध्यक्ष ॲड. अजित एम. देशमुख यांनी दिली आहे.

बीड जिल्ह्यात दारू दुकानांमुळे अनेक कुटुंब उध्वस्त झाले आहेत. त्यामुळे आम्ही सातत्याने आतापर्यंतच्या सर्व जिल्हाधिकाऱ्यांकडे नवीन बियर बार लायसन देऊ नका, म्हणून मागणी करत असतो. दारूने नुकसान होऊ नये, हा त्या पाठीमागचा हेतू असतो.

प्रलंबित असलेल्या अनेक अर्जांपैकी पान २ वर

## हायवेच्या गुत्तेदाराने न.प.ची पाईप लाईन पुन्हा फोडली


### बीडचा पाणी पुरवठा पुन्हा लांबणीवर

बीड दि.१८ (प्रतिनिधी):- कोणाचा कोणाला मेळ नाही. उड्डाण पुलाचे काम करणाऱ्या हायवेच्या गुत्तेदाराने पालीच्या तळ्यातून येणारी नगर पालिकेची पिण्याच्या पाण्याचा पुरवठा करणारी पाईप लाईन दोन ठिकाणी फोडली. त्यामुळे आता पुन्हा पाणी पुरवठा लांबणीवर पडण्याची शक्यता वर्तविली जात आहे. दोन डिपार्टमेंटमध्ये कुठलाही समन्वय नसल्याने असे प्रकार होत आहेत. पाईप लाईन फोडणाऱ्या गुन्हेगारावर गुन्हे दाखल करावेत अशा प्रतिक्रिया व्यक्त होत आहेत.

अगोदरच काडीवडगाव येथील दुरुस्तीमुळे बीड नगर पालिकेचा पाणी पुरवठा लांबणीवर पडलेला आहे. तीन-चार दिवस पाणी पुरवठा होणार नाही. असे असतांनाच पालीच्या तळ्यातून येणाऱ्या मेन पाईप लाईनला गुत्तेदाराने दोन ठिकाणी फोडले. यामुळे आता याच्या दुरुस्तीच्या दोन-चार दिवस जातील, पुन्हा पाणी पुरवठ्याची बोंबाबोंब होणार आहे. निष्काळजीपणे काम करणाऱ्या या उड्डाण पुलाच्या गुत्तेदारावर गुन्हा दाखल करावा अशी मागणी होत आहे. बीड नगर पालिकेच्या पाणी पुरवठा विभागाच्या गलथान कारभारामुळे नेहमीच पाणी पुरवठ्यामध्ये अनेक अडथळे निर्माण होत आहेत. त्यातच दुरुस्तीच्या नावाखाली ८-८ दिवस पाणी पुरवठा पुढे ढकलला जात आहे. त्यामुळे नागरिकात संताप व्यक्त होत आहे.

### बीड शहरासाठी वेगळी पाण्याची टाकी करा

शहरातील सर्व भागात म्हणजे चारही दिशेला मोठमोठ्या पिण्याच्या पाण्याच्या टाक्या नगर पालिकेने केलेल्या आहेत. शहराचा मध्यवर्ती भाग असलेल्या भागात मात्र टाकी नाही. त्यामुळे नगर पालिकेने शहरातील छत्रपती संभाजी महाराज क्रीडा संकुलाच्या बाजुला असलेल्या कोपऱ्यावर न.प.च्या जागेत एक मोठी टाकी निर्माण करावी जेणेकरुन शहरातील पाणी पुरवठ्याला मदत होईल.




## आयुष्यमान भारत मिशनचे अध्यक्ष डॉ.ओमप्रकाश शेटे आज व उद्या दिंद्रुडमध्ये

बीड दि.१८ (प्रतिनिधी):- आयुष्यमान भारत मिशन महाराष्ट्र समितीचे अध्यक्ष डॉ.ओमप्रकाश शेटे हे आज दि.१९ फेब्रुवारी रोजी दिंद्रुडमध्ये येत आहेत. डॉ.शेटे यांच्या उपस्थितीत दिंद्रुड आणि माजलगावमध्ये विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.डॉ.ओमप्रकाश शेटे हे आज दि.१९ फेब्रुवारी २०२६ रोजी सकाळी १० वाजता दिंद्रुड येथील खोलेश्वर विद्यालयात शिवजन्मोत्सवा निमीत्त आयोजित रक्तदान शिबीरास भेट देणार आहेत. सायंकाळी ७.३० वाजता पान २ वर



## त्या दिवशी मी दिल्लीत होतो -प्रफुल्ल पटेल

गोंदिया दि.१८ (वृत्तसेवा):- उपमुख्यमंत्री व राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष अजित पवार यांच्या विमान अपघातात अनेक संशयास्पद बाबी असल्यामुळे आम्ही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे या प्रकरणाची चौकशी केंद्रीय गुन्हे अन्वेषण विभागामार्फत पान २ वर

## गिरधारीलाल दरगड यांचे निधन



बीड दि.१८ (प्रतिनिधी):- अंबाजोगाई येथील प्रसिद्ध विधिज्ञ ॲड.गिरधारीलालजी दरगड यांचे १७फेब्रुवारी रोजी निधन झाले. गिरधारीलालजी यांच्या पार्थिवावर दि.१८ फेब्रुवारी २०२६ बुधवारी संध्याकाळी ७वाजता अंबाजोगाई येथील स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या निधनाने सर्वत्र हळहळ व्यक्त होत आहे. दरगड कुटुंबियावर कोसळलेल्या दु:खात पार्श्वभूमी परिवार सहभागी आहे.

## जाहीर प्रगटन

तमाम बीड येथील लोकांना खालील जाहिर प्रगटनाद्वारे कळविण्यात येते की, १) मौजे बीड तरफ गिराम सर्व्हे नंबर ११६ संपुर्ण जमीनीचे हैद्राबाद व कुळ वहिवाट आणि शेत जमीन अधिनियमचे कलम ३८/ई प्रमाणे प्रकरण क्र. २०२५/आर ओ आर/कुळ/कावि/४९५४ हे तहसिलदार तथा अप्पर तहसिलदार (कुळ) बीड यांचेकडे प्रकरण चालू आहे. त्याच प्रमाणे सदरच्या जमीनीच्या खरेदीच्या फेरफार विरुध्द मा.अप्पर जिल्हाधिकारी, बीडकडे प्रकरण जा.क्र.२०२५/सिडी/अपील/सिआर/५२ अशी दोन प्रकरणे प्रलंबित असताना तसेच मा.आयुक्त (महसूल) संभाजी नगर यांचेकडे प्रकरण क्र.२२३/२०२३ हे प्रकरण प्रलंबित आहे. अद्यापपर्यंत मुळ मालक व कुळा मधील असलेला वाद हा संपुष्टात आला नसतानाही मालक सदर सर्व्हे नंबर ११६ बीड तरफ गिराम मधील काही जमीन कुळाचे परस्पर बेकायदेशीर विक्री केली आहे. सदरचे खरेदीखत रद्द करण्यासाठी जाहिर प्रगटन देणार यांनी मा.अप्पर तहसिलदार (कुळ), बीड यांच्याकडे प्रकरण चालु आहे. अशा परिस्थितीत ले-आऊटचा कच्चा नकाशा तयार करून जमीन खरेदीदार प्लॉटींग विक्री करत असल्याचे समजले आहे.

तरी जाहिर प्रगटनाद्वारे कळविण्यात येते की, सदरच्या खरेदीदारा बरोबर बीड तरफ गिराम सर्व्हे नंबर ११६ बाबत कोणताही प्लॉट खरेदीचा व्यवहार करू नये. जर प्लॉट खरेदीचा व्यवहार केल्यास सदर खरेदीदाराची जबाबदारी राहिल. तरी सदर बीड तरफ गिराम सर्व्हे नंबर ११६ बाबत प्लॉट खरेदीचा व्यवहार करू नये.

करिता जाहिर प्रगटन.

बीड
दिनांक : १६/०२/२०२६

- जाहिर प्रगटन देणार -
ज्ञानेश्वर पि.तुळशीराम दळवी
मार्फत : आममुखत्यारधारक
कल्याण पि.विठ्ठल कापसे

16559-13453







व्हॉइस-एनेबल्ड स्मार्ट इलेक्ट्रिक सनरूफ
प्रशस्त केबिनसह भरपूर लेगरूम आणि मोठी बूट स्पेस
बोस प्रीमियम 7 स्पीकर सिस्टम
26.03 सेमी (10.25") HD टचस्क्रीन इन्फोटेनमेंट व नेव्हिगेशन सिस्टम
R16 (D=405.6 मिमी) डायमंड कट अलॉय व्हील्स
टायर प्रेशर मॉनिटरिंग सिस्टम (हायलाइन)

30 CELEBRATING THIRTY YEARS IN INDIA
Scan for offers, updates & support or give a missed call at 9555295868
6 hai toh safe hai — 6 airbags standard
3 YEAR Unlimited** Kilometer Warranty
Up to 7 years extended warranty^^
HYUNDAI

दीप ह्युंडई | बीड: जालना रोड, आनंदवाडी, बीड. अंबेजोगाई: तथागट चौक, एच. पी. पेट्रोल पंप समोर, अंबेजोगाई. संपर्क: 9112824445

*Terms & conditions apply. *Offers and benefits mentioned are valid till 28th February 2026 or till stocks last. Offers and benefits mentioned include cash, corporate, government employee exclusive offers, either exchange or scrappage benefits as applicable. Offers and benefits may vary from variant to variant. ^Starting price mentioned is for Hyundai i20 MT Era variant. **3-year warranty or up to 100 000 km whichever is earlier for Grand i10 NIOS, AURA, i20 & i20 N Line. 3-year unlimited km warranty is applicable for EXTER, VENUE, VENUE N Line, CRETA, CRETA N Line, CRETA Electric, ALCAZAR, VERNA and IONIQ 5. ^^Up to 7 Years extended warranty or 1 40 000 km whichsoever is earlier is available for Grand i10 NIOS, i20, i20 N Line, AURA, VERNA, EXTER, VENUE, VENUE N Line, CRETA, CRETA N Line, CRETA Electric & ALCAZAR in all variants (Petrol/Diesel/CNG) and subject to payment. For more details, visit your nearest Hyundai showroom. This advertisement and car shown here is for creative representation purposes only and the depictions are for illustrative purposes. Features and specifications shown may or may not be part of standard fitment and are subject to change without prior notice. Hyundai Motor India Limited reserves the right to change specifications, colour, equipment, and schemes at any time without prior notice. The black shade on glass is due to lighting effect. Size and colour may appear to vary due to lighting and position effect.

हॉटेल साई पॅलेस
एक्झीक्युटीव्ह लॉजींग
साई पॅलेस
लॉन्स व मंगल कार्यालय
लग्न समारंभ, साखरपुडा, वाढदिवस व सर्व प्रकारच्या शुभ कार्याचे बुकिंग सुरू आहे.
: संपर्क :
9922173333 / 9403679090
9923659999 / 9326700700
जालना रोड, बीड.



पुन:श्च आपल्या सेवेत
सुरू केले आहे

# राजेश परदेशी यांना मातृशोक



बीड दि.१८ (प्रतिनिधी):- बीड शहरातील शिवाजीनगर येथील रहिवाशी असलेले राजेश (सर) जीवनलाल परदेशी यांच्या आई शकुंतलाबाई जीवनलालजी परदेशी वय (७८) वर्ष यांचे दि.१८ फेब्रुवारी रोजी दुपारी ५:०० वाजता निधन झाले असून त्यांच्यावर अंत्यविधी दि.१९ फेब्रुवारी २०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता भगवानबाबा स्मशानभूमी येथे होणार आहे. शकुंतलाबाई परदेशी यांच्या परिवारामध्ये दोन मुलं, तीन मुले, सुना, नातवंड असा परिवार आहे. परदेशी परिवार यांच्या दु:खात बीड शहर मोची समाजा सह दै. पार्श्वभूमी परिवार सहभागी आहे.

# प्रशांत अजय दुर्गे यांचे दु:खद निधन



परळी दि.१८ (प्रतिनिधी):- अजय दुर्गे यांचे चिरंजीव प्रशांत अजय दुर्गे वय (३२) यांचे दिनांक १८ फेब्रुवारी २०२६ रोजी सकाळी आकस्मित निधन झाले. त्यांचे अंत्यसंस्कार दिनांक १९ फेब्रुवारी रोजी सकाळी ८:०० वाजता सार्वजनिक मुक्तिधाम येथे करण्यात येणार आहे. दुर्गे यांच्या परिवारात आई, वडील, काका, काकू, बहीण असा परिवार आहे. दुर्गे परिवारावर कोसळलेल्या दु:खात परळी वै. मोची (रविदास) समाज सह दै. पार्श्वभूमी परिवार सहभागी आहे.

## चंपावती महोत्सवात संस्कार विद्यालयाचा जयजयकार

# संस्कार विद्यालयाने ना.उपमुख्यमंत्री व संसदरत्न श्रीकांत शिंदे महाकरंड जिंकला

बीड दि.१८ (प्रतिनिधी):- बीडच्या चंपावती महोत्सवाच्या सांस्कृतिक इतिहासामध्ये संस्कार विद्यालयाने यंदा नेत्रदीपक इतिहास घडवला. एकूण ३२२७ बालकलाकारांचा सहभाग नोंदवत प्रथम पदार्पणातच दोन्हीही महाकरंड प्राप्त करत दुहेरी यश संपादित करण्याची ऐतिहासिक आणि सर्वोच्च कामगिरी करत बीड जिल्ह्यात सांस्कृतिक कला मंचावर आपले नाव सुवर्णांकित केले. (यापूर्वी संस्कार विद्यालयाने ज्येष्ठ संस्कृत अध्यापक प्रेरक वैद्य सर यांच्या मार्गदर्शनात केवळ एक सामूहिक आदिवासी नृत्य या चंपावती महोत्सवात तीन वर्षापूर्वी साकार केले होते व सर्वप्रथम क्रमांकाचे पारितोषिक त्यावेळी प्राप्त केले होते) यंदा चंपावती महोत्सव रंगमंचावर प्रत्यक्ष जवळपास ९०० विद्यार्थ्यांना सहभागी करून घेण्यात आले होते तर चित्रकला व रांगोळी स्पर्धेमध्ये २३६० विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला आणि विशेष या महोत्सवात तब्बल ४० बक्षिसांची लयलूट करत (मराठी माध्यमातून) संस्कार विद्यालयाने महा करंडकावर आपला कब्जा करत बीडच्या सांस्कृतिक इतिहासात आपलाच दबदबा असल्याचे सिद्ध करत हे प्रशंसनीय सुयश संपादित केले.

संस्कार प्रबोधिनीचे जेष्ठ संचालक दिलीपभाऊ खिस्ती यांच्या प्रमुख उपस्थितीत अत्यंत प्रतिष्ठेचा नामदार उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे महा करंडक व डॉक्टर श्रीकांत शिंदे महाकरंडक शिवसेना जिल्हाध्यक्ष अनिलदादा जगताप, संस्कारकलारत्न प्रतिक कांबळे, संतोष मनुरकर (दै.दिव्य लोकप्रभा), संपादक वैभव स्वामी, लक्ष्मीकांत रुईकर यांच्या उपस्थितीत प्रदान करण्यात आला यावेळी संस्कार विद्यालयाचे मुख्याध्यापक दीपक सरदे, शोभाताई कुलकर्णी, पर्यवेक्षक रघुनाथ तावरे, संस्कार प्रसिद्धी विभागप्रमुख प्रेरक वैद्य, श्यामसुंदर घाडगे, शिवाजी परळकर, उपक्रमशील शिक्षिका उर्मिला



बर्दापूरकर, डॉ प्रणिता कुलकर्णी, सुनंदा कुलकर्णी, प्रज्ञा खके तसेच इतर सर्व शिक्षक वृंद, पालक- विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. संपूर्ण नाट्यगृह जय संस्कार जय जय संस्कार! जय भवानी जय शिवाजी!! घोषणेने दणाणले.

बीड दि.१८ :- शहरात अनेक भागात वाहतुकीची कोंडी होत आहे. सकाळी व सायंकाळी ही समस्या अधिक वाढते. तरी यातून काय मार्ग निघू शकतो याचा पोलिसांनी अभ्यास करावा अशी मागणी होत आहे.

# आयटीआयच्या दोन लाख विद्यार्थ्यांना मिळणार आपत्ती व्यवस्थापनाचे प्रशिक्षण

मुंबई दि.१८ (प्रतिनिधी):- कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता मंत्री मंगलप्रभात लोढा यांच्या संकल्पनेतून राज्यातील दोन लाख आयटीआयच्या विद्यार्थ्यांना टप्प्याटप्प्याने आपत्ती व्यवस्थापनाचे प्रशिक्षण मिळणार आहे. आपत्ती व्यवस्थापनाचा दीर्घ अनुभव असलेल्या अनिरुद्धाज अकॅडमी ऑफ डिझास्टर मॅनेजमेंट आणि कौशल्य विभागांतर्गत व्यवसाय शिक्षण आणि प्रशिक्षण संचालनालय यांच्यात आज यासंदर्भात सामंजस्य करार करण्यात आला आहे.

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी सशक्त भारत घडवण्यासाठी देशवासियांसाठी विविध उपक्रम यशस्वीपणे राबवत आहेत. योग दिन, खेलो इंडिया याचाच हा भाग आहे. तर राज्यातही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मार्गदर्शनात कौशल्य विभागाकडून ही पारंपरिक खेळांचे महत्व नव्या पिढीला पटवून देण्यासाठी राज्यभरातील आयटीआयमध्ये क्रीडा महाकुंभ ही आयोजित करण्यात येतो. आता याच शृंखलेत जनसेवेच्या भावनेतून आपत्ती व्यवस्थापन प्रशिक्षण कार्यक्रम राबवून देशसेवेचे काम आयटीआय मध्ये होत असल्याचे प्रतिपादन कौशल्य विकास मंत्री मंगलप्रभात लोढा यांनी यावेळी केले. कोणतीही आपत्ती ही सांगून येत नसते, आपत्ती मानव निर्मित असो किंवा नैसर्गिक असो, अशा वेळी मानवी सुरक्षेला प्राधान्य देऊन यामध्ये युवांचा सहभाग वाढवून जिल्हा आपत्ती व्यवस्थापनला सहकार्य होण्यासाठी आपत्ती बचावकार्य करणारी यंत्रणा तयार करता येईल. आपत्तीचे व्यवस्थापन आणि बचावकार्य याचे प्रशिक्षण प्रत्येक नागरिकांनी घेतले पाहिजे, असेही मंत्री लोढा यांनी सांगितले.

अनिरुद्धाज अकॅडमी ऑफ डिझास्टर मॅनेजमेंट राज्यातील ४१९ शासकीय आयटीआयमध्ये विद्यार्थ्यांना विना शुल्क प्रात्यक्षिकांसह आपत्ती व्यवस्थापनाचे प्रशिक्षण देणार असल्याचे अकादमीचे मुख्य कार्यकारी अधिकारी सुनील मंत्री यांनी यावेळी सांगितले. मानवाने प्रगती केली असली तरी, आपत्तीचे स्वरूप ही त्यानुसार बदलले असून आपत्ती व्यवस्थापनचे प्रशिक्षण नव्या पिढीला देण्याचा आमचा उद्देश असल्याचे व्यवसाय शिक्षण आणि प्रशिक्षण संचालनालयाच्या संचालिका श्रीमती माधवी सरदेशमुख यांनी यावेळी सांगितले. तर शहरी आणि ग्रामीण भागातील विविध आपत्तींचा अभ्यास करून अकादमीने हा प्रशिक्षण कार्यक्रम तयार केला आहे. आपत्तीतील उपाययोजना आणि बचाव कार्य याचे प्रामुख्याने प्रशिक्षण विद्यार्थ्यांना देण्यात येणार असल्याची माहिती अकादमीचे प्रतिनिधी हरीश महाजन यांनी दिली. यावेळी व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालयाचे सह संचालक सतीश सूर्यवंशी उपस्थित होते.

# सफदर अली देशमुख राष्ट्रीय विद्यालय, पेंडगाव इयत्ता १० वी चा निरोप समारंभ संपन्न

बीड दि.१८ (प्रतिनिधी):- पेंडगाव येथील स.अ. दे. राष्ट्रीय विद्यालय मध्ये इयत्ता १० वी च्या विद्यार्थ्यांना निरोप समारंभ व बक्षीस वितरण कार्यक्रम संपन्न झाला. याप्रसंगी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शाळेच्या मुख्याध्यापिका येवले मॅडम तर प्रमुख पाहुणे म्हणून गावचे सरपंच सोमनाथ पवार, माजी पंचायत समिती सदस्य किशोर आप्पा काळकुटे, सेवा सोसायटी चेअरमन सुखदेव धट होते. याप्रसंगी अध्यक्ष व प्रमुख पाहुणे यांनी



सरस्वतीचे पूजन दिप प्रज्वलन केले. त्यानंतर दहावीच्या विद्यार्थ्यांनी आपले मनोगत व्यक्त केले. त्यामध्ये कु.गिरी रुद्राक्षा, प्रधान अक्षरा, वेदिका गौरक्षक, रेश्मा वडमारे व त्यानंतर वर्गशिक्षक धारकर सर यांनी पेपर लिहिताना आपल्यामध्येआत्मविश्वास, सकारात्मकता असावी, असा संदेश दिला. तर पुराणिक सर यांनी आपला परीक्षेविषयी कसा दृष्टिकोन असावा, याविषयी मार्गदर्शन केले. कोकाटे सर यांनी यश व अपयशाला कसे सामोरे जावे, याविषयी मार्गदर्शन केले. तर चादर सर यांनी परीक्षेविषयी सखोल मार्गदर्शन केले. प्रमुख पाहुणे किशोर आप्पा काळकुटे यांनी चांगला पेपर लिहून आपले व आपल्या गावाचे नाव मोठे कसे होईल? यासाठी प्रयत्न करावा असे मार्गदर्शन केले. तर सेवा सोसायटी चेअरमन सुखदेव धट यांनी आपल्या जीवनामध्ये अभ्यास व वेळ किती महत्त्वाचा आहे? याविषयी मार्गदर्शन केले.

त्यानंतर २६ जानेवारी निमित्त झालेल्या विविध शालेय क्रीडा स्पर्धेचे बक्षीस वितरण मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. शेवटी अध्यक्षीय भाषणामध्ये शाळेच्या मुख्याध्यापिका आदरणीय येवले मॅडम यांनी मोलाचा संदेश दिला. तुम्हाला जीवनात यश प्राप्त करायचे असेल तर मेहनत, जिद्द व संयम हा त्रिसूत्री मंत्र विद्यार्थ्यांना दिला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन वर्ग नववीची विद्यार्थिनी बहिर प्रतीक्षा हिने केले. तर कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन गाडे सर यांनी केले. यावेळी शिक्षक शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# पायलटचा वापर करून अजित पवारांच्या विमानाचा अपघात? –रोहीत पवार

मुंबई दि.१८ (प्रतिनिधी):- उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या विमान अपघातासंदर्भात आम्ही काही दिवसांपूर्वी पत्रकार परिषद घेतली होती. त्यानंतर तपास यंत्रणांना या घटनेचा तपास सुरू केला. याचे समाधान आहे. पण ज्या गतीने हा तपास सुरू आहे. त्यावरून अनेक प्रश्न उपस्थित होत आहेत.

पान १ वरून

## मुस्लिम समाजाला दिलेले ५% आरक्षण रद्द

प्रवर्ग-अ अंतर्गत शासकीय व निमशासकीय सरळसेवा भरतीमध्ये व शैक्षणिक संस्थेतील प्रवेशासाठी ५ टक्के आरक्षण सामान्य प्रशासन विभागाच्या वाचा क्र १ येथील अध्यादेशान्वये विहीत करण्यात आले होते. त्यानुसार, वाचा क्रं २ येथील अल्पसंख्यांक विकास विभागाच्या शासन निर्णयान्वये सरळ सेवेच्या पदभरतीमध्ये विशेष मागास प्रवर्ग-अ (एसबीसी-ए) प्रवर्गासाठी ५ टक्के आरक्षण देण्यात आले होते. अल्पसंख्याक विकास विभागाच्या वाचा क्र. २ येथील शासन निर्णयातील निदेशानुसार या विभागाकडून वाचा क्र. ३ येथील शासन निर्णय व वाचा क्र ५ येथील शासन परिपत्रकान्वये विशेष मागास प्रवर्ग-अ मधील मुस्लिम समाजास नियमानुसार जात प्रमाणपत्र व जात वैधता प्रमाणपत्रे देण्याबाबतची कार्यवाही करण्यासंदर्भात सूचना निर्गमित करण्यात आल्या होत्या.

## अखेर एकाही बिअरबारला परवानगी नाही

काही अर्ज आजच्या बैठकीमध्ये निकाली निघणार होते. बीड जिल्ह्यातील वाढती बेकारी आणि गुन्हेगारी लक्षात घेता समाज हितासाठी व्यसनाधीनता कमी होणे गरजेचे आहे. त्यामुळे ही मागणी बीडचे जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांच्यासह राज्याचे उत्पादन शुल्क आयुक्त राजेश देशमुख यांचे कडे देखील करण्यात आली होती.

आजच्या बैठकीमध्ये एकाही नवीन बियर बारला परवानगी देण्यात आलेली नाही. त्यामुळे जिल्हा प्रशासनाला धन्यवाद देत सामाजिक स्वास्थ्य जपणे, ही प्रशासनाची जबाबदारी असल्याने हा निर्णय पुढेही कायम ठेवावा, असे ड. अजित देशमुख यांनी म्हटले आहे.

## त्या दिवशी मी दिल्लीत होतो...

(सीबीआय) करावी, अशी मागणी निवेदनाद्वारे केल्याचे खासदार प्रफुल्ल पटेल यांनी सांगितले.

अजित पवारांचे जाणे राष्ट्रवादी काँग्रेस आणि राज्यासाठी दुर्दैवी घटना आहे. या घटनेचा सखोल तपास विविध यंत्रणांद्वारे होत आहे. राज्य सरकारसुद्धा तपास करत आहेत. परंतु यामागे अनेकांनी संशय व्यक्त केला आहे. त्यामुळे या अपघाताची सखोल तपासणी होणे आवश्यक आहे.

अचानक एवढी मोठी दुर्घटना कशी होऊ शकते, याची सीबीआयद्वारे चौकशी करण्यात यावी आणि ही घटना महाराष्ट्रात घडल्यामुळे महाराष्ट्र सरकारने सीबीआय चौकशीची मागणी करावी, अशा मागणीचे निवेदन राष्ट्रवादी काँग्रेसतर्फे मुख्यमंत्र्यांना आम्ही दिले. सध्या स्वायत्त संस्था चौकशी करत असल्याने ब्लॅक बॉक्ससंदर्भात मला अधिक माहिती नाही. मात्र, तो डॅमेज झाल्याची प्राथमिक माहिती आहे, असे पटेल यांनी सांगितले.

## त्या दिवशी मी दिल्लीत होतो...

(सीबीआय) करावी, अशी मागणी निवेदनाद्वारे केल्याचे खासदार प्रफुल्ल पटेल यांनी सांगितले.

अजित पवारांचे जाणे राष्ट्रवादी काँग्रेस आणि राज्यासाठी दुर्दैवी घटना आहे. या घटनेचा सखोल तपास विविध यंत्रणांद्वारे होत आहे. राज्य सरकारसुद्धा तपास करत आहेत. परंतु यामागे अनेकांनी संशय व्यक्त केला आहे. त्यामुळे या अपघाताची सखोल तपासणी होणे आवश्यक आहे.

अचानक एवढी मोठी दुर्घटना कशी होऊ शकते, याची सीबीआयद्वारे चौकशी करण्यात यावी आणि ही घटना महाराष्ट्रात घडल्यामुळे महाराष्ट्र सरकारने सीबीआय चौकशीची मागणी करावी, अशा मागणीचे निवेदन राष्ट्रवादी काँग्रेसतर्फे मुख्यमंत्र्यांना आम्ही दिले. सध्या स्वायत्त संस्था चौकशी करत असल्याने ब्लॅक बॉक्ससंदर्भात मला अधिक माहिती नाही. मात्र, तो डॅमेज झाल्याची प्राथमिक माहिती आहे, असे पटेल यांनी सांगितले.

## संत भगवानबाबा प्रतिष्ठाण परिसरातील स्मशानभूमीला मिळाले अधिकृत पीआर कार्ड

हिंदू स्मशानभूमीचे पी आर कार्ड सुपूर्द केले. यावेळी उपनगराध्यक्ष विनोद मुळूक, नगरसेवक दत्ता जाधव उपस्थित होते.

सदर स्मशानभूमीत हिंदू व सर्वधर्मियांचे अंत्यविधी पार पडतात. दोन वर्षांपूर्वी स्मशानभूमी च्या जागेवर अतिक्रमणाचा प्रयत्न होत असल्याचा प्रकार उघडकीस आला होता. या अतिक्रमणा बाबतीत सचिन मुळूक यांनी कठोर भूमिका घेत तातडीने पोलिस व प्रशासनाकडे धाव घेत प्रकरण निदर्शनास आणून दिले. जिल्हाप्रमुख सचिन मुळूक यांनी योग्य पावले उचलत प्रचंड संयमाने प्रकरण हाताळले त्यामुळे संभाव्य जातीय सलोखा अबाधित राहिला.

या प्रकरणी पोलिसांनी संबंधित संस्था व व्यक्तींना नोटिसा बजावून तंबी दिली तसेच प्रतिबंधात्मक कारवाई केली. त्यानंतर स्मशानभूमीची अधिकृत नोंद व्हावी यासाठी मुळूक यांनी भूमिअभिलेख कार्यालयाकडे पी.आर. कार्डसाठी प्रस्ताव सादर केला होता. सुमारे दीड वर्षांच्या पाठपुराव्यानंतर आणि आवश्यक कागदपत्रांची पूर्तता केल्यानंतर संत भगवानबाबा प्रतिष्ठाण परिसरातील हिंदू स्मशानभूमीची ३ एकर ६ गुंठे जागेची भूमिअभिलेख कार्यालयात अधिकृत नोंद करण्यात आली असून नगरपालिकेला पी.आर. कार्ड प्रदान करण्यात आले.

बीड शहरातील एक महत्त्वाचा सामाजिक मोठा विषय यशस्वीरित्या पार पाडल्याबद्दल जिल्हाप्रमुख सचिन मुळूक यांचे समाजातील सर्व स्तरातून अभिनंदन होत आहे.

## डॉ.ओमप्रकाश शेटे आज व उद्या दिंद्रुडमध्ये

माजलगाव येथील शिवजन्मोत्सवा निमीत्त आयोजित सर्वधर्मीय सामुहिक विवाह सोहळ्यास उपस्थित राहणार आहेत. उद्या दि. २० फेब्रुवारी रोजी सकाळी ११ ते दुपारी ३ या वेळेत दिंद्रुड येथील ओमसाई शिल्प निवासस्थानी डॉ.शेटे जनता दरबार घेणार आहेत. सायंकाळी ७वाजता वडवणी तालुक्यातील काडीवडगाव जि.प. शाळेतील स्नेहसंमेलनास उपस्थित राहणार आहेत. दि. २१ फेब्रुवारी दुपारी ३ वाजता नगराध्यक्ष शेषेराव जाधव यांच्या वडवणी निवासस्थानी सांत्वनपर भेट देणार आहेत. सायंकाळी ४ वाजता देवगाव येथे तांडा वस्ती सुधार योजनेतून सिमेंट रोड, पोलसह एलईडी बसविण्याच्या कामाचा शुभारंभ डॉ.शेटे यांच्या हस्ते होणार आहे. सायंकाळी ५ वाजता काडीवडगाव येथे सिमेंट रोड कामाचा शुभारंभ होणार असून सायंकाळी ६ वाजता देवडी येथील सक्षम इंग्लिश स्कूलच्या स्नेहसंमेलनास उपस्थित राहणार आहेत. त्यानंतर रात्री ८.२५ वाजता परळी येथून पनवेल एक्सप्रेसने ते पुण्याकडे रवाना होणार आहेत.

पान ६ वरून

## प्रथम घोडके यांनी केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या परीक्षा उत्तीर्ण होण्याचे ध्येय

काकडे, नगराध्यक्ष जिया बेग, रंगनाथ धोंडे, व्यापारी संघटनेचे संजय मेहेर, इंजिनिअर किशोर नाना हंबर्डे, संतोष शेठ मेहेर, ज्येष्ठ पत्रकार प्रफुल्ल सहस्त्रबुद्धे, तालुका कृषी अधिकारी गोरक्षनाथ तरटे, विस्तार अधिकारी मनोरंजन धस, खंडू दादा जाधव, अनिल ढोबळे, शादुल्ला बेग टाटा हे उपस्थित होते

पुढे बोलताना आमदार सुरेश धस म्हणाले की, आष्टी सारख्या ग्रामीण भागातून विद्यार्थ्यांनी अभ्यास करून हे यश प्राप्त केले आहे मोठे काम करण्याची आवश्यकता असून कृत्रिम बुद्धिमत्ता आर्टिफिशियल इंटेलिजन्स चा उपयोग करून शेती क्षेत्रामध्ये नवनवीन संशोधन करण्याची आवश्यकता असून शेतकऱ्यांनी कोणते वाण वापरावे उत्पादन वाढीसाठी कृषी क्षेत्रातील संशोधन होण्याची आवश्यकता आहे प्रथम घोडके यांनी पहिल्याच परीक्षेमध्ये यश प्राप्त केले आहे अजून वय कमी असल्यामुळे पुढील स्पर्धा परीक्षेसाठी आणखी भरपूर संधी उपलब्ध आहे त्यामुळे त्यांनी लोकसेवा आयोगाच्या स्पर्धा परीक्षा देऊन जिल्हाधिकारी जिल्हा पोलीस प्रमुख अशा प्रकारची पदवी प्राप्त करण्यासाठी आणखी अभ्यास करावा कृषी उपसंचालक पदी काम करताना शेतकरी समोर ठेवून कष्टकरी काम करी सर्वसामान्य नागरिक यांच्या डोळ्यातील तारुण्य पाहून मन द्रवले पाहिजे आणि त्यांच्या तोंडात हसू निर्माण झाले पाहिजे अशा प्रकारचे कार्य प्रशासकीय सेवेमध्ये प्रथम घोडके यांनी करावे अशी माझी अपेक्षा असल्याचेही ते पुढे म्हणाले की ग्रामीण विद्यार्थ्यांनी आपल्या कष्टकरी आई-वडिलांनी पाहिलेले स्वप्न साकार करण्यासाठी प्रयत्न करावेत यापुढे आष्टी मुर्शिदपूर परिसरातील यशवंत किर्तीवंत प्रज्ञावंत यशस्वी विद्यार्थ्यांचा सत्कार छत्रपती शिवाजी महाराज चौकामध्येच करण्याचा निश्चय त्यांनी यावेळी व्यक्त केला यावेळी कृषी अधिकारी गोरक्ष तरटे, वसुंधरा विद्यालयाचे प्रमुख मनोज रंजन धस संजय मेहेर प्रफुल्ल सहस्त्रबुद्धे यांची समायोजित भाषणे झाली सत्कारमूर्ती प्रथम घोडके यांनी मनोगत व्यक्त करताना त्यांना मदत करणाऱ्या सर्वांचे ऋण व्यक्त केले यावेळी त्यांच्या आई-वडिलांचा सत्कार करण्यात आला या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन बाळासाहेब तळेकर यांनी केले यावेळी उपनगराध्यक्ष शैलेश सहस्त्रबुद्धे नगरसेवक सुनील रेडेकर नगरसेवक किशोर झरेकर नगरसेवक भारत मुरकुटे ज्ञानदेव राऊत उपस्थित होते सुरुवातीस प्रथम घोडके आणि त्यांच्याबरोबर यशस्वी विद्यार्थ्यांची अण्णाभाऊ साठे चौकातून छत्रपती शिवाजी महाराज चौकापर्यंत मिरवणूक आयोजित करण्यात आली होती.

## आपल्या प्रगतीत दुसऱ्याचा विचार म्हणजे अंत्योदय–प्रकाश पाठक

मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. दुसऱ्या सत्रामध्ये डॉ.बाळासाहेब सराटे, अपर्णा कुलकर्णी, संजय सराफ, तर तिसऱ्या सत्रात माधवी राजे, नरसिंग झरे,यांनी एकात्म मानवदर्शन विषयावर विविध विषयांची मांडणी केली. या सत्रासाठी अध्यक्ष म्हणून अनुक्रमे उमेश जगताप,डॉ. लक्ष्मीकांत बाहेगव्हाणकर हे होते. सत्रांचे सूत्रसंचालन डॉ. अनुजा कास्तिकर, डॉ.सुभाष पटेकर यांनी केले. या कार्यक्रमात सावरकर महाविद्यालयातील डॉ.सुहास मोराळे, डॉ. सुनिता कुरुडे, प्रा.राजपाल जाधव, डॉ सचिन कंदले, प्रा.आनंद रत्नपारखी, डॉ.अनंत देशपांडे, डॉ स्वाती कुलकर्णी, डॉ रूपाली कुलकर्णी यांनी लिहिलेल्या पुस्तकांचे प्रकाशन मान्यवरांनी केले. या वेळी महाराष्ट्रातील विविध जिल्ह्यातून आलेले प्राध्यापक, संशोधक, विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## माजी आ.भीमराव धोंडेंच्या संकल्पनेतुन शेतकऱ्यांसाठी राज्यस्तरीय कृषी प्रदर्शन

सुभाष साळवे (जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी, बीड), उद्धव गर्जे (उपविभागीय कृषी अधिकारी, बीड), सुरज पाटील (जिल्हा मृद सर्वेक्षण व मृद चाचणी अधिकारी, बीड),श्रीमती वैशाली पाटील (तहसीलदार, आष्टी), गोरख तरटे (तालुका कृषी अधिकारी, आष्टी), अमृत गांगर्डे (तालुका कृषी अधिकारी, शिरूर कासार), शिवकुमार स्वामी (उपजिल्हाधिकारी, बीड - निवासी),दादाराव जाधवर (कृषी उपसंचालक, बीड), साहिल सय्यद (कृषी विकास अधिकारी, बीड),वल्लभ भोसले (जिल्हा गुण नियंत्रण निरीक्षक, बीड),गोकुळ बागलाने (गटविकास अधिकारी, पंचायत समिती आष्टी), ओंकार शेळके (तालुका कृषी अधिकारी, पाटोदा), ) आदी मान्यवर उपस्थित राहणार आहेत.स्वागताध्यक्ष म्हणून मा. आ. भीमराव धोंडे (संस्थापक अध्यक्ष, आनंद चॅरिटेबल संस्था, आष्टी) हे मान्यवरांचे स्वागत करणार आहेत. निमंत्रक म्हणून डॉ. अजयदादा धोंडे (सहसचिव, आनंद चॅरिटेबल संस्था, आष्टी) व श्री. अभयराजे धोंडे (कोषाध्यक्ष, आनंद चॅरिटेबल संस्था, आष्टी) कार्यरत आहेत.प्रायोजक जिजाई मसाले,सहप्रयोजक प्रीमियम स्कूल ऑफ डिजिटल मार्केटिंग,सहकार्य कृषी विभाग महाराष्ट्र शासन आणि मेहत्रे डेकोरेटर्स, इव्हेंट मॅनेजमेंट वाबळेज इव्हेंट असणार आहेत.कार्यक्रमाचे ठिकाण पंडित जवाहरलाल नेहरू विद्यालयासमोर आष्टी शेतकरी, कृषी तज्ञ, विद्यार्थी व नागरिकांसाठी हे प्रदर्शन मार्गदर्शक ठरणार असून मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन आयोजक श्री छत्रपती शाहू फुले आंबेडकर कृषी महाविद्यालय आष्टी यांच्यावतीने करण्यात आले आहे.

## शेतकरी विरोधी कृषी कराराची प्रतिकात्मक होळी

भावांतर योजनेतून नुकसानभरपाई देणार का, असा सवाल उपस्थित करत शेतकऱ्यांची दिशाभूल करणाऱ्या सरकार विरोधात यावेळी जोरदार घोषणाबाजी करण्यात आली.

## डॉ.राजकुमार राठोड यांच्या पुस्तकाचे

जिल्हा बीड (महाराष्ट्र) आहेत. रेणुकाई ग्राफिक्स यांनी मुखपृष्ठ तयार केले.या राष्ट्रीय प्रकाशन सोहळ्यासाठी महाराष्ट्रातून डॉ. सुनीता लहाने, शंतनू खरवडे, हरिभाऊ सुतार, अमृता भुमरे, चंद्रकन्या सारसेकर, प्रतिभा साबळे, जोत्स्ना पवार, अर्जुन कुचेकर आदी शिक्षणतज्ज्ञ उपस्थित होते. तसेच देशातील १३ राज्यांतून आलेले प्रतिनिधी या कार्यक्रमास उपस्थित राहून डॉ. राठोड यांच्या कार्याचा गौरव केला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आर. एम. रोहित (गुजरात) यांनी केले तर अमितकुमार (बिहार) यांनी आभार प्रदर्शन केले. डॉ. राजकुमार राठोड यांचे हे पुस्तक बीड जिल्हा परिषद तसेच इस्त्रोच्या शैक्षणिक सहलीसाठी विद्यार्थ्यांची निवड परीक्षा तयारी करण्यासाठी अत्यंत उपयुक्त असून विद्यार्थ्यांना विज्ञान, अंतराळ संशोधन आणि सामान्य ज्ञानाबाबत मार्गदर्शन करणारे आहे. हे पुस्तक शिक्षक, विद्यार्थी व मार्गदर्शकांसाठी मार्गदर्शक ठरणार असल्याचे मान्यवरांनी यावेळी सांगितले. राष्ट्रीय स्तरावर पार पडलेला हा पुस्तक प्रकाशन सोहळा अत्यंत यशस्वी ठरला असून महाराष्ट्राच्या शैक्षणिक क्षेत्रासाठी ही अभिमानास्पद बाब आहे, अशी भावना उपस्थित मान्यवरांनी व्यक्त केली.

## उघड्या डीपीमुळे छेडछाडीचा संशय

आहे. मात्र देखभाल व सुरक्षेअभावी ही यंत्रणा निष्प्रभ ठरत असल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे. एखाद्या गंभीर गुन्हयातील, चोरीतील किंवा अपघाताचा तपास जलद गतीने करता यावा यासाठी पोलीस प्रशासनाकडून उपाययोजना केल्या जात आहेत परंतु काही ठिकाणी कॅमेरे च्या डीपी उघडे असल्याने त्या डीपीतून काही छेडछाड होण्याची शक्यता आहे. उघड्या डीपी तात्काळ लॉक करून सुरक्षित कराव्यात, नादुरुस्त कॅमेरे दुरुस्त करावेत तसेच संबंधित यंत्रणेची नियमित तपासणी करण्यात यावी, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे. पोलीस प्रशासन व महापालिकेने याकडे गांभीर्याने लक्ष देऊन त्वरित कारवाई करावी, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

## धारदार शस्त्राने तिघांवर हल्ला ; एकाचा मृत्यू

आली. तर अन्य दोन जखमी तरूणांवर अहिल्यानगर येथील एका खाजगी रूग्णालयात उपचार सुरू असून त्याची प्रकृती चिंताजनक असल्याचे बोलले जात आहे.घटनास्थळी आष्टीचे सहायक पोलीस निरीक्षक विजय नरवाडे,विक्रांत हिंगे,पोलीस उपनिरीक्षक कृष्णा शिंदे,याच्यासह अंमलदारांनी भेट दिली असून पुढील तपास पोलीस करीत आहेत.

## अल्पवयीन मुलीच्या शोधासाठी हेलपाटे

घेण्यात अद्याप यश आलेले नाही.मुलीचे अपहरण झाल्याने त्यांनी वारंवार पोलिसांना शोध लावण्याची विनंती केली. यासंदर्भात मुंबई उच्च न्यायालयाच्या संभाजीनगर खंडपीठात याचिका दाखल करून दाद मागण्यात आली. त्यात नुकतेच खंडपीठाने संबंधित मुलगी आढळून आल्यास न्यायालयासमोर हजर करण्याचे आदेश पोलिसांना दिले आहेत. परंतु पोलीस तपासात कोणतीही प्रगती झालेली नाही. त्यामुळे आई-वडील व हे कुटुंबीय हतबल झाले आहे.

पती-पत्नी, दोन मुली व एक लहान मुलगा असे हे कुटुंब असून, शेती करून उपजीविका करते. या प्रकरणी पोक्सोचा गुन्हा दाखल करणे आवश्यक होते. परंतु हे कलम लावले गेले नाही, असा वडिलांचा आरोप आहे. मुलीला फूस लावून पळवून नेले असून, त्यामुळे तिचे शैक्षणिक नुकसान होत आहे. तिच्या काळजीने आई-वडील सातत्याने आजारी पडत असून, पोलिसांनी माझ्या मुलीचा तातडीने शोध लावावा, अशी मागणी संबंधित मुलीच्या वडिलांनी केली आहे.

## पारधी समाजावर हल्ला करणाऱ्या गावगुंडांना तात्काळ

पोलिस ठाण्यात तक्रार दाखल करण्यात आली आहे. यात पोलिसांनी काही आरोपींवर अनुसुचित जाती/जमाती प्रतिबंधक कायद्यान्वये गुन्हे दाखल केला असून आरोपी अद्यापही फरार आहेत. सुर्डी येथील पारधी वस्तीवरील लोकांची घरे व झोपड्यांची तोडफोड करुन पुर्नतः उद्धवस्त केल्या आहेत. त्यामुळे निवऱ्याची गैरसोय झाली आहे. त्या पारधी समाजाचे तात्काळ पुनर्वसन करुण्यात यावे तसेच आरोपींना व या घटनेपाठीमागचा मास्टरमाईंड कोण आहे याचा शोध घेण्यात यावा. त्याचबरोबर पारधी समाजाला शस्त्रधारी पोलिस संरक्षण देण्यात यावे अन्यथा वंचित बहुजन आघाडी तिव्र स्वरूपाचे आंदोलन करेल असा इशारा वंचीत बहुजन आघाडी जिल्हा उपाध्यक्ष राजाभाऊ पोकळे, तालुकाध्यक्ष पप्पू गायकवाड, तालुका महासचिव किशोर भोले, तालुका उपाध्यक्ष किशोर चव्हाण, तालुका प्रसिद्धी प्रमुख ज्ञानेश्वर हवाले, युवा कार्यकर्ते तीर्थराज सोनवणे यांच्या स्वाक्षरीने तहसिलदार गेवराई आणि उपविभागीय पोलीस अधिकारी गेवराई यांना लेखी निवेदनाद्वारे देण्यात आला आहे.

## आष्टी व पाटोद्यातील २१०८ उमेदवार देणार आष्टीत परीक्षा

बसणार आहेत. उमेदवारांची संख्या लक्षात घेता परीक्षा केंद्रांचे नियोजन आष्टी शहरातील प्रशस्त व सोयीसुविधांनी सुसज्ज अशा शैक्षणिक संस्थांमध्ये करण्यात आले आहे.लेखी परीक्षा ८० गुणांची असून किमान ३६ टक्के गुण आवश्यक राहणार आहेत. त्यानंतर २० गुणांची तोंडी परीक्षा घेण्यात येईल. अंतिम निवड गुणवत्ता यादीच्या आधारे करण्यात येणार आहे. संपूर्ण प्रक्रिया पारदर्शक पद्धतीने राबविण्यात येणार असल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले आहे.उपविभागीय अधिकारी श्रीमती वसीमा शेख यांनी सांगितले की, उमेदवारांची मोठी संख्या लक्षात घेऊन आवश्यक सुविधा उपलब्ध असलेल्या केंद्रांची निवड करण्यात आली आहे. परीक्षा प्रक्रिया शिस्तबद्ध, पारदर्शक आणि निर्विघ्न पार पडावी यासाठी प्रशासनाकडून सर्व यंत्रणा सज्ज ठेवण्यात आली आहे.

### परीक्षा केंद्रे व उमेदवार संख्या

भानुदास पाटील महाविद्यालय, आष्टी (ग्रामीण रुग्णालयाजवळ) – १६ हॉल – ३८४ उमेदवारपंडित जवाहरलाल नेहरू ज्युनियर कॉलेज, आष्टी (ग्रामीण रुग्णालयाजवळ) – १३ हॉल – ३१२ उमेदवारॲड. टी. बी. हजे महाविद्यालय, आष्टी (तहसील कार्यालयासमोर) – २२ हॉल – ५२८ उमेदवारकॉलेज ऑफ एज्युकेशन (बी.एड), आनंद शिक्षण प्रसारक मंडळ, माळवंड रोड, मुंढेपुर, आष्टी – १४ हॉल – ३३६ उमेदवारश्री छत्रपती शाहू कृषी महाविद्यालय, आनंद शिक्षण प्रसारक मंडळ, माळवंड रोड, मुंढेपुर, आष्टी – १० हॉल – २४० उमेदवारमहर्षी शंकरराव अभियांत्रिकी महाविद्यालय, आनंद शिक्षण प्रसारक मंडळ, माळवंड रोड, मुंढेपुर, आष्टी – १३ हॉल – ३०८ उमेदवार, एकूण उमेदवार – २१०८

हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक,संपादक गंमत भंडारी यांनी शाम प्रिंटर्स, नवी भाजी मंडई बीड येथे छापून पार्श्वभूमी कार्यालय, नवी भाजी मंडई रोड, बीड येथे प्रकाशित केले. फोन नं. (०२४४२) २३०१०१.
AR/TECH/Regd. N.P./34/Beed/99-2000 RNI Regd.no. MAHMAR/1990/501 E-mail Address-parshvabhoomi@gmail.com

# पार्श्वभूमी

दिनांक १९ फेब्रुवारी २०२६ पान –३


## वाहेगाव येथील ग्रामपंचायत भवनाचे लोकार्पण उत्साहात

बीड दि १८ (प्रतिनिधी)- वाहेगाव येथे नूतन ग्रामपंचायत भवनचा भव्य लोकार्पण सोहळा अत्यंत उत्साहात संपन्न झाला. विकासाचा ध्यास असलेले लोकनेते, माजी आमदार अमरसिंह (भैय्यासाहेब) पंडित यांच्या शुभहस्ते या नूतन इमारतीचे लोकार्पण करण्यात आले.ग्रामीण भागाचा कायापालट करण्यासाठी सुसज्ज प्रशासकीय इमारतीची गरज होती, जी आज पूर्ण झाली आहे. या कार्यक्रमाप्रसंगी परिसरातील सर्व आजी-माजी सरपंच, उपसरपंच, ग्रामपंचायत सदस्य आणि प्रतिष्ठित नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## तत्वशील कांबळे यांचे सासरे रानोबा गायकवाड यांचे निधन



बीड दि १७ फेब्रुवारी २०२६ रोजी सायंकाळी ६ वाजता आजारीपणामुळे दु:खद निधन झाले दि १८ फेब्रुवारी २६ अंत्यविधी अंकुश नगर समशान भूमी बीड येथे झाला. ते निवृत्त कृषी पर्यवेक्षक कृषी कार्यालय गेवराई येथे त्यांनी सेवा दिली. त्यांच्या पश्चात पत्नी ४ मुली दहा नातवंडे व एक पनतु असा परिवारआहे. जलदानविधी दि १९ फेब्रुवारी २०२६ संत नामदेव नगर राहत्या घरी होणार आहे.

## उच्च शिक्षणातून नेतृत्व घडते; गुणवत्तावृद्धीसाठी सामूहिक प्रयत्न गरजेच– मॅनेजर श्याम पवार

बीड दि १८ (प्रतिनिधी )- शहरातील आदित्य कृषी महाविद्यालय येथे अंतिम वर्षातील विद्यार्थ्यांसाठी ''बँकिंग क्षेत्रातील करिअर संधी व कृषी क्षेत्रातील पदव्युत्तर शिक्षणाचे महत्त्व'' या विषयावर मार्गदर्शन कार्यक्रम उत्साहात पार पडला.
महाविद्यालय हे केवळ पदवीपुरते मर्यादित नसून नेतृत्व व गुणवत्तावृद्धी घडविण्याचे केंद्र आहे, असे प्रतिपादन प्राचार्य श्याम भुतडा यांनी केले,

आदित्य शिक्षण संस्था अंतर्गत आयोजित या उपक्रमात संस्थेचे मुख्य प्रवर्तक सुभाषचंद्र सारडा, संचालक डॉ. आदित्य सारडा व संचालिका डॉ. आदिती सारडा यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यक्रम पार पडला. प्राचार्य श्याम भुतडा यांनी महाविद्यालयाची स्थापना, शैक्षणिक प्रगती आणि संशोधनात्मक वाटचालीचा आढावा घेत विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी राबविण्यात येणाऱ्या विविध उपक्रमांची माहिती दिली. आदित्य कृषी जैवतंत्रज्ञान महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सतीश कचरे यांनी कृषी पदव्युत्तर शिक्षणाचे महत्त्व स्पष्ट करत एम.एस्सी. (कृषी), एम.टेक (कृषी अभियांत्रिकी), एमबीए (ॲग्री बिझनेस मॅनेजमेंट) आदी अभ्यासक्रमांविषयी मार्गदर्शन केले. सीनियर मॅनेजर श्याम पवार यांनी बँकिंग क्षेत्रातील विविध संधींचा आढावा घेत सरकारी, खासगी व सहकारी बँकांमधील भरती प्रक्रिया, स्पर्धा परीक्षा आणि आवश्यक कौशल्ये याविषयी माहिती दिली. संवाद कौशल्य, संगणक ज्ञान, गणितीय व तर्कशक्ती, इंग्रजी भाषेवरील प्रभुत्व या गुणांचे महत्त्व त्यांनी अधोरेखित केले. सुरुवातीपासूनच आकर्षक वेतन व पदोन्नतीच्या संधी उपलब्ध असल्याचेही त्यांनी नमूद केले. आदित्य कृषी अभियांत्रिकी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अमोल सानप यांनी जिद्द व चिकाटीच्या बळावर यश संपादन करता येते, असा विश्वास व्यक्त केला. कार्यक्रमाचे नियोजन डॉ. धनंजय सातपुते यांनी केले. सूत्रसंचालन विद्यार्थी संग्राम तनपुरे यांनी तर आभार डॉ. निर्मला ठोके यांनी मानले.

# हॉस्पिटलचे पाणी चक्क सिमेंट रस्त्यावर सोडल्याने पादचारी व दुचाकी स्वाराची होतेय दररोजच धुळवंड

## नाट्यगृह रस्त्यावरील या हॉस्पिटल चालकाने नागरिकांना वेठीस धरले

बीड दि १८ (प्रतिनिधी)- एस पी कार्यालया समोरून यशवंतराव चव्हाण नाट्यगृहाकडे जाणाऱ्या रस्त्यावर अनेकांनी आपली हॉस्पिटल थाटली आहेत. त्यामुळे हॉस्पिटलमध्ये येणारे रुग्ण व त्यांचे नातेवाईक आपली वाहन रस्त्यावरच थांबवतात. त्यामुळे सदर रस्ता रहदारीसाठी अर्धाही शिल्लक राहत नाही. असे असताना नाट्यगृहापासून काही अंतरावर असलेल्या याच रस्त्यावरील एका हॉस्पिटलवाल्याने आपल्या हॉस्पिटलचे पाणी सतत रस्त्यावर सोडलं असल्याने सकाळी मॉर्निंग वॉकला जाणाऱ्या ज्येष्ठ नागरिकासह सायकल, पायी जाणारे विद्यार्थी असोत की दुचाकीस्वार असोत त्यांची दररोजच धुळवंड होऊ लागली आहे. एवढेच काय या हॉस्पिटलच्या समोर असलेल्या दुसऱ्या हॉस्पिटल मध्ये येणाऱ्या रुग्ण नातेवाईकांना आपल्या गाड्या पाण्यात उभ्या करून जाण्याची वेळ येत आहे तेव्हा बीड नगरपालिकेच्या सफाई विभागाची देखरेख करणाऱ्या संबंधिताला हा प्रकार का दिसेना? किंवा संबंधित हॉस्पिटल चालकाला पाण्याचा बंदोबस्त करा म्हणून सूचना करण्याचे धाडस का होईना? असा सवाल नागरिकांमधून केला जाऊ लागला आहे.

यासंदर्भात माहिती अशी की एस पी कार्यालयाकडून जाणाऱ्या यशवंतराव चव्हाण नाट्यगृह रस्त्यावर मोठी रहदारी असते. पालवन चौका पासून आशा टॉकीज, तुळजाभवानी चौक, यशवंतराव चव्हाण नाट्यगृह ते थेट एस पी कार्यालय, एसबीआय बँक तसेच जिल्हा रुग्णालय हा जवळचा रस्ता म्हणून मोठी रहदारी असते. तर या रस्त्यावर दक्षिण बाजूस येथून तेथून मोठमोठी हॉस्पिटल आहेत. हॉस्पिटल मधलं सांडपाणी वाहून जायला नालीच शिल्लक नाही. शिवाय या रस्त्यावर भाजपचे कार्यालय देखील आहे. त्यामुळे हा रस्ता सतत गजबजलेला असतो. सद्यस्थितीला यशवंतराव चव्हाण नाट्यगृहात अनेक शाळांची वार्षिक स्नेहसंमेलन होत आहेत. परंतु याच रस्त्यावर नाट्यगृहाच्या काही अंतरावर असलेल्या एका हॉस्पिटल मधून गेली काही दिवसापासून दररोज रस्त्यावर पाणी सोडलं जातं. चार चाकी जात असताना रस्त्यावरच पाणी उडून शाळकरी मुलं असोत की पादचारी यांच्या अंगावर जातं. तर पुढच्या टायरने उडालेले दुचाकीच पाणी स्वाराच्या पायावर येत असल्याने त्यांचे पँटी वर पडून कपडे खराब होतात. विशेष म्हणजे याच हॉस्पिटलच्या समोर दुसरे हॉस्पिटल आहे. या हॉस्पिटलमध्ये येणाऱ्या रुग्ण नातेवाईकांची चार चाकी समोरच थांबलेले असतात. परंतु या दक्षिण बाजूच्या हॉस्पिटल मधलं बाहेर आलेलं पाणी चक्क उत्तर बाजूच्या या हॉस्पिटल समोरून वाहात असल्याने या हॉस्पिटलमध्ये येणाऱ्या रुग्ण नातेवाईकांना त्रास सहन करावा लागतो. एवढेच काय याच हॉस्पिटलच्या बाजूला जात असलेल्या गल्लीमध्ये हे पाणी तळे साचल्यासारखे साचत असून या भागातील रहिवाशांना देखील मोठा त्रास सहन करण्याची वेळ आली आहे. या हॉस्पिटल मधून रस्त्यावर पाणी का सोडल जातय? याचं मात्र कोडच आहे. हॉस्पिटल स्वच्छ करताना रस्त्यावर एकदाच पाणी येईल पण दिवसभरात कधीही पाणी रस्त्यावर सोडलं जातं. त्याचा त्रास मात्र या रस्त्यावरून जाणाऱ्या येणाऱ्या नागरिकांना दिवस-रात्र सहन करण्याची वेळ आली आहे. सदरचा प्रकार घडत असताना तो सहन करावा लागत आहे असे असताना ज्या नगरपालिकेच्या संबंधित विभागाकडे स्वच्छतेची




जबाबदारी आहे त्याची देखरेख करणाऱ्या व्यक्तीला सदरचा प्रकार का दिसत नाही? की मोठ्याचं हॉस्पिटल म्हणून बोलण्याचं धाडस होत नाही. असा प्रश्न आता लोक करू लागले आहेत. तेव्हा संबंधित हॉस्पिटल चालकाने या उपर दखल घेऊन आपल्या हॉस्पिटलचे पाने रस्त्यावर येऊ नये यासाठी काळजी घ्यावी अन्यथा नावानिशी तक्रारी कराव्या लागतील असा इशारा देखील काही नागरिकांनी बोलताना दिला.

## घरकुल योजनेची जिल्हा प्रशासनाकडून क्रूर थट्टा

# ग्रामस्थांना घरकुलासाठी दोन लाखांचा निधी पण डेमो हाऊससाठी मात्र दहा लाखांचा खर्च

बीड दि १८(प्रतिनिधी)-शासनाच्या घरकुल योजनेअंतर्गत बेघरांना साधारण दोन लाख रुपयांचे अनुदान दिले जाते, मात्र बीड जिल्हा परिषदेच्या आवारात उभारण्यात आलेल्या डेमो घरकुलासाठी तब्बल दहा लाख रुपये खर्च करण्यात आल्याचा आरोप सामाजिक कार्यकर्ते डॉ. गणेश ढवळे यांनी केला आहे. याबाबत त्यांनी जिल्हाधिकारी बीड तसेच मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद बीड यांच्याकडे लेखी तक्रार दाखल केली असल्याचे प्रसिद्धी पत्रकात नमूद केले आहे.

घरकुल योजनेत केंद्र शासनाकडून सुमारे १ लाख २० हजार रुपये, राज्य शासनाकडून अतिरिक्त ५० हजार रुपये, मनरेगा अंतर्गत २६ ते २८ हजार रुपये आणि स्वच्छतागृहासाठी १२ हजार रुपये असे मिळून एकूण सुमारे २ लाख रुपयांचे अनुदान दिले जाते. मात्र जिल्हा परिषद आवारातील डेमो हाऊससाठी ३१ जानेवारी २०२४ रोजी ४ लाख ९९ हजार २७८ रुपयांची वर्क ऑर्डर देण्यात आली. त्यानंतर ५ जानेवारी २०२६ रोजी आणखी ४ लाख ९९ हजार रुपयांच्या अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता देण्यात आली. अशा प्रकारे एकाच कामासाठी दोन टप्प्यांत सुमारे १० लाखांचा खर्च करण्यात आल्याचा आरोप आहे.उभारण्यात आलेल्या डेमो हाऊसमध्ये एक लहान हॉल व दोन छोट्या खोल्या असून दोन लोखंडी दरवाजे, दोन मोठ्या खिडक्या व एक छोटी खिडकी बसविण्यात आली आहे. घर पत्र्याचे असून सुमारे २१७ चौरस फुट बांधकामासाठी सहा कॉलम उभारण्यात आले आहेत. पत्र्याच्या घरासाठी स्लॅबसाठी लागणारे कॉलम उभारण्याची गरज काय?, असा सवाल डॉ. ढवळे यांनी उपस्थित केला आहे.घरकुल मंजुरीपासून हप्ते खात्यावर पडण्यापर्यंत चिरीमिरी द्यावी लागते. शासनाकडून मंजूर ५ ब्रास वाळू प्रत्यक्षात मिळत नाही. हातात सव्वा लाख रुपये उरतात, त्यातून घर कसे बांधायचे?'' असा सवाल ग्रामस्थ करत असताना डेमो हाऊससाठी १० लाखांचा



खर्च म्हणजे घरकुल योजनेची क्रूर थट्टा असल्याची संतप्त प्रतिक्रिया डॉ. ढवळे यांनी दिली आहे.सदर प्रकरणाची सखोल चौकशी करून संबंधित अधिकाऱ्यांवर प्रशासकीय कारवाई करावी, अशी मागणी त्यांनी केली असल्याचे प्रसिद्धी पत्रकात नमूद केले.

## अंथरवन पिंपरी आश्रम शाळेची शैक्षणिक सहल उत्साहात संपन्न

बीड दि १८(प्रतिनिधी)- बीड पासून जवळच असलेल्या प्राथमिक-माध्यमिक व उच्च माध्यमिक आश्रम शाळा अंथरवण पिंपरी (तांडा) या प्राथमिक विभाग शाळेची विद्यार्थ्यांची सहल दि.१३ फेब्रुवारी रोजी श्री छत्रपती संभाजीनगर व परिसरात ऐतिहासिक स्थळांना भेटी देऊन उत्साहात संपन्न झाली. या सहलीत विद्यार्थ्यांनी घृष्णेश्वर मंदिर वेरूळ येथील शंभू महादेवाचे दर्शन घेतले. वेरूळ येथील जगप्रसिद्ध लेण्याला भेट देऊन विद्यार्थ्यांना त्याबद्दल माहिती देण्यात आली. खुलताबाद येथील भद्रा मारुतीचे दर्शन घेण्यात आले. त्यानंतर बीबी का मकबरा या



ठिकाणी भेट देऊन त्या वास्तूचे महत्त्व विद्यार्थ्यांना विशद केले. सिद्धार्थ उद्यान येथील प्राणी संग्रहालयास भेट दिली पैठण येथील संत ज्ञानेश्वर उद्यान येथील संगीत कारंजे पाहिल्यानंतर विद्यार्थी भारावून गेले शेवटी संत एकनाथ महाराज समाधीचे दर्शन घेऊन सहभोजन करून सहल नियोजित स्थळी सुखरूप पोहोचली. या सहलीचे आयोजन मुख्याध्यापक शिंदे डी.ए. सर यांनी केले. या सहलीच्या यशस्वीतेसाठी खरसाडे सर. दातार सर, शिंदे व्ही.एन. व पवार व्ही.एन. यांनी परिश्रम घेतले.

## आपले हक्क मिळवण्यासाठी राज्यातील सर्व मुस्लिम संघटनानी एकत्र येण्याची गरज–शेख अमर

बीड दि १८( प्रतिनिधी)- महाराष्ट्र शासनाच्या सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाने १७ फेब्रुवारी २०२६ रोजी एक अत्यंत दुर्दैवी शासन निर्णय निर्गमित केला आहे. या निर्णयाद्वारे, मुस्लिम समाजातील विशेष मागास प्रवर्ग-अ अंतर्गत येणाऱ्या व्यक्तींना जात प्रमाणपत्र आणि जात वैधता प्रमाणपत्र देण्याबाबतचे जुने सर्व शासन निर्णय आणि परिपत्रक अधिकृतपणे रद्द करण्यात आले आहेत. म्हणजेच मुस्लिम समाजाला मिळणारे आरक्षण रद्द करण्यात आले याचा निषेध करून आपल्या हक्कासाठी मुस्लिम सर्व संघटनांनी एकत्र येण्याची गरज असल्याचे नगरसेवक शेख अमर यांनी म्हटले.

यासंदर्भात प्रसिद्धीस दिलेल्या पत्रकात पुढे नमूद केले की अमर शेख यांनी म्हटले २०१४ मध्ये शैक्षणिक आणि नोकरीसाठी जे ५% आरक्षण जाहीर झाले होते, त्याबाबत सकारात्मक पाऊल उचलण्याऐवजी, सरकारने जुन्या प्रक्रियाच रद्द करून टाकल्या आहेत. उच्च न्यायालयाच्या अंतरिम स्थगितीचे आणि अध्यादेश कालबाह्य झाल्याचे कारण देऊन सरकारने मुस्लिम समाजाच्या हक्कांवर गदा आणली आहे.एकीकडे सबका साथ, सबका विकास म्हणायचे आणि दुसरीकडे आरक्षणासाठी आवश्यक असलेली कागदपत्रे मिळवण्याचे मार्ग बंद करायचे, हा दुटप्पीपणा मनवा लागेल? मुंबई उच्च न्यायालयाने मुस्लिम समाजाला शिक्षणात ५ टक्के आरक्षण मान्य केलेले असतानाही, महाराष्ट्रात आजतागायत त्याची अंमलबजावणी झालेली नाही. न्यायालयाने मंजूर केलेल्या आरक्षणाची अंमलबजावणी सरकारने न करणे हे लोकशाहीसाठी घातक आहे.समाजातील मागास घटकांना मुख्य प्रवाहात आणण्याऐवजी त्यांना पुन्हा अंधारात ढकलण्याचे काम या सरकारने केलं आहे. राज्यातील मुस्लिम संघटना यांनी एकत्र येऊन हि लढाई पुन्हा सुरू करावी असे आवाहन महाराष्ट्र बांधकाम मजूर संघटनेचे अध्यक्ष अमर शेख यांनी केले प्रसिद्धीस दिलेल्या पत्रकातून केले आहे.

## आनंदी आयुष्याचा मंत्र या विषयावर रविवारी विशेष व्याख्यानाचे आयोजन

अंबाजोगाई दि १८(प्रतिनिधी)- रोटरी क्लब ऑफ मनोहर अंबाजोगाई व इनरव्हील क्लब अंबाजोगाई यांच्या संयुक्त विद्यमाने रविवार दि. २२ फेब्रुवारी रोजी अंबाजोगाई येथे प्रमुख वक्ते बी.के.राजसिंह (माऊंट अबू, राजस्थान) यांचे आनंदी आयुष्याचा मंत्र या विषयावर एक विशेष व्याख्यान आयोजित करण्यात आले आहे. आजच्या धकाधकीच्या जीवनात ताण, स्पर्धा आणि अपेक्षांच्या ओझ्याखाली आपण अनेकदा आनंद हरवून बसतो. आनंदी, सकारात्मक आणि समाधानी जीवन कसे जगावे ?, मानसिक स्वास्थ्य, नातेसंबंध आणि आत्मविश्वास कसा वाढवावा या सर्व प्रश्नांची उत्तरे देणारे प्रेरणादायी व्याख्यान दिनांक २२ फेब्रुवारी रविवार रोजी दुपारी ४ वाजता लोकनेते गोपीनाथरावजी मुंडे सभागृह, खोलेश्वर महाविद्यालय, अंबाजोगाई या ठिकाणी आयोजित करण्यात आले असून यावेळी प्रमुख वक्ते बी.के.राजसिंह (माऊंट अबू, राजस्थान) हे आपले मौलिक विचार व्यक्त करून अनमोल मार्गदर्शन करणार आहेत. तरी या व्याख्यानाचा लाभ घेण्याचे आवाहन रोटरी क्लब ऑफ मनोहर अंबाजोगाईचे रो.भिमाशंकर शिंदे (अध्यक्ष), रो.सुनील व्यवहारे (सचिव) आणि रो.पुरूषोत्तम रादंड (प्रोजेक्ट डायरेक्टर) यांनी केले आहे.

## अंबाजोगाई बस स्थानकावर प्रवाशी महिलेचे सोन्याचे २९ हजार रू. किमतीचे दागिने लंपास

अंबाजोगाई दि १८ (प्रतिनिधी)- येथील बस स्थानकात प्रवाशांच्या गर्दीचा फायदा घेत भरदिवसा चोऱ्या होण्याचे सत्र सुरूच असल्याचे पुन्हा एकदा समोर आले आहे.या बस स्थानकावर बसमध्ये चढत असताना मौजे तळणी येथील एका महिलेच्या गळ्यातील २९ हजार रुपये किमतीचे सोन्याचे दागिने अज्ञात चोरट्याने शिताफीने लंपास केले आहेत. या प्रकरणी अंबाजोगाई शहर पोलीस ठाण्यात अज्ञात आरोपीविरुद्ध गुन्हा नोंदवण्यात आला आहे.तळणी येथील रहिवासी गंगाबाई राजु गित्ते या त्यांच्या पतीसह दाढदुखीच्या उपचारासाठी अंबाजोगाई येथील एका खाजगी रुग्णालयात आल्या होत्या. डॉक्टरांना दाखवून गावाकडे परतण्यासाठी त्या मंगळवारी दुपारी दोन वाजेच्या सुमारास अंबाजोगाई बसस्थानकावर पोहोचल्या. दुपारी सव्वा दोन वाजेच्या सुमारास स्थानकावर अंबाजोगाई-अहमदपूर ही बस आली असता त्या बसमध्ये चढू लागल्या. बसमध्ये प्रवाशांची प्रचंड गर्दी होती. या गर्द गैरफायदा घेत अज्ञात व्यक्तीने बसमध्ये चढ़ असताना गंगाबाई यांच्या गळ्यातील २ ग्रॅमच सोन्याचे मंगळसूत्र आणि ७ ग्रॅमचे सोन्याचे मणी असा एकूण २९ हजार १६ रुपयांचा ऐवजगळ्यातून तोडून चोरून नेला.काही वेळाने प्रवासात गळ्याला हात लावला असता दागिने चोरीला गेल्याचे गंगाबाई यांच्या लक्षात आले. त्यांनी तत्काळ पतीला ही माहिती दिली आणि गाव गाठून त्यानंतर पोलीस ठाणे गाठून तक्रार दिली. या तक्रारीवरून अंबाजोगाई शहर पोलिसांनी अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. पोलीस हवालदार बदाम अर्शल या प्रकरणाचा पुढील तपास करत आहेत.

## ग्रामीण पोलीस ठाणे हद्दीत गुटखा,मटका,चक्री व अवैध दारू विक्री कोणाच्या आशिर्वादाने ?

बीड दि १८ (प्रतिनिधी)- शहरातील ग्रामीण पोलीस ठाणे हद्दीत मटका,गुटखा, चक्री, अवैध दारू व शिंदी विक्री खुलेआम सुरू असल्याचा आरोप नागरिकांकडून केला जात आहे.पोलीस प्रशासनाकडून कारवाईच्या सूचना देण्यात आल्या असतानाही प्रत्यक्षात मात्र अवैध धंद्यांना आळा बसलेला दिसत नसल्याने प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.यामुळे स्थानिक गुन्हे शाखेने अशा अवैध धंद्यावर कारवाई करण्याची देखील गरज आहे.

मटका व्यवसाय पूर्वी उघडपणे सुरू होता; आता तो कानाकोपऱ्यात लपूनछपून चालवला जात असल्याची चर्चा आहे. शहरात चक्रीवर सट्ट्याची मोठ्या प्रमाणात उलाढाल होत असल्याचा दावा केला जात असून, त्यामुळे काही जण मालामाल होत असताना अनेक कुटुंबे आर्थिक संकटात सापडत असल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे. गुटखा विक्रीवर बंदी असतानाही हॉटेल, टपऱ्या, किराणा दुकाने आणि चहाच्या गाड्यांवर सहज उपलब्ध होत असल्याचेही चित्र आहे. दरम्यान, वाळू वाहतुकीवर कारवाई होत असताना इतर अवैध धंद्यांकडे दुर्लक्ष केले जात असल्याची टीका होत आहे.

वाळूअभावी बांधकामे रखडली असून वाहनधारक व मजुरांना आर्थिक अडचणींना सामोरे जावे लागत असल्याचेही सांगितले जात आहे.अवैध धंदे चालवणाऱ्यांवर कठोर कारवाई करून गंभीर स्वरूपाच्या गुन्ह्यांमध्ये आवश्यक त्या कायद्यांनुसार कारवाई करावी, अशी मागणी नागरिकांतून होत आहे. ग्रामीण पोलीस ठाणे हद्दीत सुरू असलेल्या या प्रकारांवर वरिष्ठ अधिकाऱ्यांनी लक्ष घालून पारदर्शक चौकशी करावी, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

## काकाजींच्या हस्ते मोफत हृदयरोग शिबिराचे उद्घाटन

अंबाजोगाई दि १८ (प्रतिनिधी)- माजी.खा.डॉ.प्रितमताई गोपीनाथराव मुंडे यांच्या वाढदिवसानिमित्त माईस विश्वराज हॉस्पिटल तर्फे आयोजित मोफत बाल हृदयरोग शिबिर व शस्त्रक्रिया या सामाजिक उपक्रमाचे उद्घाटन अंबाजोगाई नगर परिषदेचे नगराध्यक्ष नंदकिशोर(काकाजी) मुंदडा यांच्या उपस्थितीत वरद क्लिनिक व सोनोग्राफी सेंटर येथे संपन्न झाले. समाजातील गरजू व बालरुग्णांना दिलासा देणारा हा उपक्रम असून, बाल हृदयरोग तपासणी व आवश्यक शस्त्रक्रिया मोफत करून देण्याचा संकल्प यावेळी व्यक्त करण्यात आला. उपस्थित मान्यवरांनी या स्तुत्य उपक्रमाबद्दल आयोजकांचे अभिनंदन करून पुढील कार्यासाठी शुभेच्छा दिल्या.

## अभियंता ज्ञानेश्वर मिसाळ यांचा कोठारी प्रतिष्ठान कडून सत्कार

जामखेड दि १७(प्रतिनिधी)- जामखेड नगरपरिषद मध्ये कार्यरत असलेले शहरातील पाणीपुरवठा आणि स्वच्छता अभियंता म्हणून चांगल्या प्रकारे काम करणारे यांच्या कामाची दखल घेत ज्ञानेश्वर मिसाळ यांचा कोठारी प्रतिष्ठानच्या वतीने सामाजिक कार्यकर्ते संजय कोठारी यांनी सत्कार केला. बीड रोड चे काम चालू असताना बऱ्याच व्यापाऱ्यांचे व रहवाशी यांचे नळ कनेक्शन तुटले होते या बाबत आपण स्वतः तक्रार केली असता अभियंता ज्ञानेश्वर मिसाळ यांनी ताबडतोब संबंधित कॉन्ट्रॅक्टरला नोटीस काढून उभा राहून सगळ्यांचे काम करून घेतले त्याबद्दल त्यांचा आम्ही सत्कार करत आहोत .आज योगायोगाने कोठारी प्रतिष्ठानला त्यांनी भेट दिली असता त्यांचा सत्कार सामाजिक कार्यकर्ते संजय कोठारी यांनी केला यावेळी आरोग्य मुकादम राजू गायकवाड मारुती आजबे उपस्थित होते

## एआयएमआयएमचे महावितरणला निवेदन

केज दि १८ (प्रतिनिधी) -मुस्लिम बांधवांचा पवित्र रमजान महिना काही दिवसांवर येऊन ठेपला आहे. या काळात मुस्लिम बांधवांना मूलभूत सुविधांची कमतरता भासू नये, यासाठी ऑल इंडिया मजलिस -ए-इत्तेहादुल मुस्लिमीन केज शहराच्या वतीने प्रशासनाला धारेवर धरत विविध मागण्यांचे निवेदन सादर करण्यात आले. रमजान च्या काळात शहर वासीयांना त्रास होऊ नये, यासाठी शहराध्यक्ष तालेब इनामदार यांच्या नेतृत्वाखाली शिष्ट मंडळाने नगर पंचायत आणि महावितरण कार्यालयात खालील मागण्या मांडल्या. केज शहरातील सर्व प्रभागांमध्ये विशेषतः मशिदींच्या परिसरात नियमित स्वच्छता राखावी आणि पिण्याच्या पाण्याचा पुरवठा सुरळीत करावा. प्रकाश व्यवस्था रात्रीच्या वेळी नागरिकांची ये-जा वाढते, त्यामुळे पथदिवे तातडीने दुरुस्त करून सर्वत्र प्रकाश व्यवस्था चोख ठेवावी. अखंडित वीजपुरवठा सहरी आणि इफ्तारच्या वेळी कोणतीही वीज कपात करू नये. महावितरणने तांत्रिक बिघाड टाळून अखंडित वीजपुरवठा सुनिश्चित करावा.रमजान हा इबादत आणि पवित्रतेचा महिना आहे. अशा मागण्याचा यामध्ये समावेश आहे. यावेळी एआयएमआयएमचे शहराध्यक्ष तालेब इनामदार, यांच्यासह शाकेर कुरेशी, अजिम सय्यद, फारोज पठाण, रईस शेख, फरीद इनामदार, नाजेम शेख व इतर पदाधिकारी उपस्थित होते.तर प्रशासनाने या मागण्यां कडे गांभीर्याने लक्ष देऊन तात्काळ कार्यवाही करण्याचे आश्वासन दिले आहे.

## संपादकीय

### शिवरायांचे महिला विषयक धोरण आणि आजची स्थिती

रांझ्याच्या पाटलाने बलात्कार केल्याचे समजताच त्याचे हातपाय तोडून चौरंग केला. आज मात्र माता भगिनींची अब्रू लुटणारे हजारो नराधम न्यायालयाच्या छत्राखाली स्वतःला वाचवण्यासाठी धडपडत आहेत ! म्हणून आजही शिवरायांच्या स्वराज्याची छाप प्रत्येकाच्या श्वासाश्वासात आहे. पाच वर्षांपूर्वी हिंगणघाट येथे एकतर्फी प्रेमातून प्राध्यापिका असलेल्या तरुणीला एका नराधमाने जिवंत जाळल्याची घटना असो की कोपर्डीच्या बहिणीची झालेली निर्घृण हत्या असो की मागील वर्षी बदलापुरात झालेला चिमुरडी वरील अत्याचार ! या सर्व घटनांनी संपूर्ण महाराष्ट्र सुन्न झाला होता. केवळ याच घटना नाही तर यासारख्या अनेक घटना रोजच या पावन भूमीत घडत आहेत. महिलांच्या अब्रूची लक्तरे वेशीवर टांगली जात आहे. आज या पावन भूमीत कोणतीच महिला सुरक्षित नाही मग ती तीन वर्षाची तीन वर्षाची चिमुरडी असो की सत्तर वर्षाची आजी. नराधमांना कायद्याचा धाक नाही. नराधमांना अटक होते त्यांना फाशीची शिक्षा व्हावी म्हणून जनतेतून उठाव होतो. मोर्चे निघतात. अनेक वर्ष न्यायालयात खटला चालतो. या नराधमांना फाशी होईल अशी अपेक्षा असताना त्यांना जन्मठेपेची शिक्षा होते आणि ही शिक्षाही रद्द व्हावी यासाठी हे नराधम वरच्या न्यायालयात अपील करतात. दररोजचे वर्तमानपत्र चाळलं तर त्यात विनयभंग, छेडछाड, बलात्काराची एकतरी बातमी दिसतेच. आजूबाजूला घडणाऱ्या महिलांविरोधी गुन्ह्यांच्या घटना पाहिल्या की शिवरायांच्या विचारांची, शिवरायांच्या धोरणाची कधी नव्हे इतकी गरज आज असल्याचे जाणवते. कारण शिवरायांच्या शिवशाहित महिला जितक्या सुरक्षित होत्या तितक्या त्या कोणत्याच काळात नव्हत्या. कारण शिवरायांचे महिला विषयक धोरण. मध्ययुगीन काळात शिवरायांचा जन्म झाला. या काळात महाराष्ट्र परकीयांच्या गुलामगिरीत होता. शिवरायांनी महाराष्ट्राला परकीयांच्या गुलामगिरीतून मुक्त करून हिंदवी स्वराज्य स्थापन करण्याचा संकल्प केला. मराठी माणसांच्या मनात अस्मिता निर्माण केली. अठरापगड जातींना एकत्र करून त्यांनी हिंदवी स्वराज्याची स्थापना केली. यात सर्वात मोठे कार्य म्हणजे महिलांचा सामाजिक दर्जा उंचावण्यासाठी त्यांनी केलेल्या सुधारणा, नियम आणि उचललेले कठोर पावले. त्यांचे हे पाऊल म्हणजे महिला मुक्तीसाठी केलेली क्रांतीच होती. हजारो वर्षांपासून चालू असलेल्या अनिष्ठ चालीरीती बदलण्याची धमक कोणत्याच राजाने दाखवली नाही, ती धमक शिवरायांनी दाखवली. त्यांनी स्वतःच्या आईला सती जाण्यापासून परावृत्त केले ही त्याकाळातील सामाजिक क्रांतीच होती. त्याकाळी महिलांना गुलामीची वागणूक दिली जात होती. महिलांची खरेदी – विक्री केली जात होती. महिलांना गुलाम म्हणून वागवले जात होते. शिवरायांनी या सर्व गोष्टींवर बंदी आणली. शिवरायांचे महिलाविषयक धोरण अत्यंत आदराचे होते. जिजामाता या शिवरायांच्या गुरू होत्या. जिजामातेनेच त्यांना स्त्री जातीच्या सन्मानाचे बाळकडू पाजले म्हणूनच पर स्त्री मातेसमान मानणारा व शत्रूच्या स्त्रियांना सन्मान देणारा युगपुरुष म्हणून शिवरायांची इतिहासात नोंद झाली. शिवराय खऱ्या अर्थाने रयतेचे राजे होते. रक्षणकर्ते होते. सैन्याला राजांचे सक्त आदेश होते. स्त्रियांना मोहिमेवर आणू नये, त्यांना युद्धात पकडू नये. स्त्री संबंधी गुन्ह्याला क्षमा नव्हतीच उलट कठोर शिक्षा होती, मग तो कोणीही असो. साधा शिपाई, वतनदार, किल्लेदार, कुणालाही माफी नव्हती. हातपाय तोडणे, देहदंड अशा कठोर शिक्षा दिल्या जात. रांझ्याच्या पाटलाने गरीब शेतकऱ्याच्या तरुण मुलीला उचलून नेऊन भोगली. त्या तरुण मुलीने आत्महत्या केली. जेंव्हा ही गोष्ट शिवरायांना समजली तेंव्हा शिवरायांनी त्याच्या मुसक्या बांधून त्याला पुण्याला आणले. त्याचे हातपाय तोडण्याची शिक्षा दिली. जी गोष्ट रांझ्याच्या पाटलाची तीच गोष्ट कल्याणच्या सुभेदाराच्या सुनेची. तीच गोष्ट सकूजी गायकवाड या सेनापतीची. महिलांसबंधी गुन्ह्याला त्यांच्याकडे क्षमा नव्हती उलट कडक शिक्षाच होती. शिवरायांच्या या महिलाविषयक धोरणामुळेच महिला सुरक्षित होत्या. आजची परिस्थिती मात्र पूर्ण भिन्न आहे. महिला अत्याचाराच्या घटना वाढत आहेत. महिलांना सुरक्षा पुरवण्यात सरकार अपयशी ठरत आहे. कायदे असूनही त्याची प्रभावी अंमलबजावणी होत नाही. त्यामुळे गुन्हेगारांना कायद्याचा धाक उरला नाही. राज्यकर्त्यांनी शिवरायांच्या महिलाविषयक धोरणांचा अभ्यास करुन ते राबवण्याचा प्रयत्न केल्यास देशात शिवशाही अवतरल्याशिवाय राहणार नाही.

# छत्रपती शिवरायांनीच केली होती जगातील पहिली सर्जिकल स्ट्राइक

शब्दांकन
अॅड.महेश बेदरे
पत्रकार,पाटोदा

काही दिवसांपूर्वीच शिवरायांवरील रणजीत देसाई यांनी लिहिलेली श्रीमान योगी ही कादंबरी वाचनात आली यावरून शिवाजी महाराज जयंतीनिमित्त पुण्यातील लाल महालातील शाहिस्तेखानावर केलेल्या धाडसी छाप्याची आठवण अभिमानाने जागवावी लागते. ५ एप्रिल १६६३ च्या रात्री, रमजानच्या काळात, मोगल छावणी निष्काळजी असताना छत्रपती शिवाजी महाराज यांनी मोजक्या निवडक मावळ्यांसह लाल महालात प्रवेश केला. लग्नाच्या मिरवणुकीचा बहाणा, वेषांतर आणि शहरातील गुप्त वाटांचा अचूक वापर ही सर्व योजना गनिमी काव्याचा अप्रतिम नमुना ठरली या कादंबरीत या घटनेचे अतिशय रोमहर्षक चित्त थरारक आणि अंगावर शहारे आणणारे वर्णन आहे. या धाडीत तानाजी मालुसरे, येसाजी कंक यांसारखे विश्वासू सहकारी सहभागी होते, असे उल्लेख आढळतात. लाल महाल हा शिवरायांचा बालपणीचा निवास असल्याने त्याची रचना, अंतर्गत मार्ग आणि प्रवेशद्वारे त्यांना तंतोतंत ठाऊक होती–हीच माहिती मोहिमेच्या यशाचे गुपित ठरली. शाहिस्तेखान याची बोटे छाटून महाराजांनी मोगल सत्तेच्या गर्वाला जबर धक्का दिला. श्रीमान योगी या रणजित देसाई लिखित कादंबरीत या घटनेचे प्रभावी आणि रोमहर्षक चित्रण आढळते. त्या वर्णनातून शिवरायांची अचूक रणनीती, समयसूचकता आणि शत्रूच्या मनोधैर्यावर केलेला मानसशास्त्रीय प्रहार प्रकर्षाने जाणवतो. शिवरायांचा इतिहास वाचताना मन अक्षरशः अचंबित होते अचूक योजना, अचूक युद्धनीती आणि अचूक वेळ साधणे हेच त्यांच्या यशाचे खरे गमक होते, हे या प्रसंगातून स्पष्ट होते मध्यंतरी काही वर्षांपूर्वीच आपल्या हिंदुस्तान ने पाकिस्तान वर सर्जिकल स्ट्राइक करून पाकिस्तानचे कंबरडे मोडले होते ही शिवरायांच्याच सर्जिकल स्ट्राइक ची प्रेरणा निश्चित आहे कारण लाल महालातील ही कारवाई केवळ एक हल्ला नव्हे, तर स्वराज्याच्या बुद्धिमत्ता आणि शौर्याचा अजरामर दीपस्तंभ आहे .



# सौर ऊर्जा प्रकल्प आणि वाळू माफियांना चक्क अभय राजकीय नेत्यांनी आत्मचिंतन करावे – बाबुराव पोटभरे



बीड दि १८ (प्रतिनिधी)- बीड जिल्ह्यात गोरगरीब, भूमिहीन व अनुसूचित जाती-जमातीतील कास्तकरी शेतकऱ्यांच्या गायरान जमिनी सौर ऊर्जा प्रकल्पांच्या नावाखाली बळकावल्या जात आहेत. त्यामुळे जिल्ह्यातील राजकीय नेत्यांनी आत्मचिंतन करावे, असे आवाहन बहुजन विकास मोर्चाचे अध्यक्ष बाबुराव पोटभरे यांनी कोणाचेही नाव न घेता बीड येथे आयोजित पत्रकार परिषदेत केला. त्यानंतर बीड जिल्हाधिकारी यांना निवेदन देण्यात आले.

पत्रकार परिषदेत बहुजन विकास मोर्चाचे अध्यक्ष बाबुरावजी पोटभरे यांनी सांगितले की, बीड जिल्ह्यातील अनेक कास्तकरी १९७८ पासून गायरान जमीन कसत असून त्या जमिनी मशागत करून सुपीक केल्या आहेत. शासन नियमानुसार १९९० पूर्वीपासून ताब्यात असलेल्या भूमिहीन व गरीब कास्तकऱ्यांच्या नावावर जमिनी नोंद होणे अपेक्षित आहे. महसूल कार्यालये व ग्रामपंचायतींकडे तशा नोंदी असतानाही अनेक ठिकाणी जमीन हक्क प्रलंबित ठेवण्यात आले आहेत. या परिस्थितीचा गैरफायदा घेत काही राजकीय व भूमाफिया प्रवृत्ती सौर ऊर्जा प्रकल्पांच्या माध्यमातून जमिनी बळकावण्याचा प्रयत्न करत असल्याचा आरोप त्यांनी केला. संबंधित महसूल अधिकारी व प्रकल्प अधिकाऱ्यांच्या संगनमताने गरीबांना बेदखल करण्याचे प्रकार सुरू असल्यास ते तात्काळ थांबवावेत, अन्यथा जिल्हाभर तीव्र आंदोलन छेडले जाईल, तसेच याप्रश्नी आपण कोर्टात धाव घेणार आहोत, असा इशारा देण्यात आला.

तसेच माजलगाव, गेवराई व परळी तालुक्यातील वाळू ठेक्यांवर मोठ्या यंत्रसामग्रीद्वारे अवैध वाळू उपसा सुरू असल्याचा आरोपही पत्रकार परिषद व निवेदनात करण्यात आला. शासन आदेशानुसार मजुरांमार्फत व सीसीटीव्ही देखरेखीखाली वाळू उपसा होणे आवश्यक असताना पोकलेन, जेसीबी आदी यंत्रांचा वापर करून मोठ्या प्रमाणात उत्खनन होत असल्याचे सांगण्यात आले. वाळू उपसा पूर्णपणे सीसीटीव्ही निगराणीखाली करावा, नियंत्रण जिल्हाधिकारी व तहसील प्रशासनाकडे ठेवावे, सर्व वाहनांना जीपीएस बसवावे आणि यंत्राऐवजी मजुरांमार्फत काम करावे, अशी ठोस मागणी करण्यात आली.यावेळी बहुजन विकास मोर्चाचे जिल्हाध्यक्ष प्रशांत ससाणे, ज्येष्ठ नेते श्रीहरी नाना मोरे, ज्येष्ठ नेते नवनाथ आण्णा धाईजे,कार्याध्यक्ष विनोद शिंदे, युवा जिल्हाध्यक्ष जयदीप तांगडे, शेख बाबा, सचिन जावळे, विशाल वक्ते, यांची उपस्थिती होती. यावेळी बोलतानाजिल्ह्यातील काही साखर कारखाने आणि शैक्षणिक संस्थांनीही सरकारी जमिनीवर बेकायदेशीर अतिक्रमणे करून नियम पायदळी तुडवले असल्याचा आरोप करताना गरीबांच्या झोपड्या तोडणारे प्रशासन मोठ्या उद्योगांपुढे मात्र का गप्प बसते? असा संतप्त सवाल उपस्थित करण्यात आला.

## कलेक्टर–एसपींची प्रतिमा चांगली, त्यांनी कारवाई करावी

**बीड जिल्ह्याचे जिल्हाधिकारी व पोलीस अधीक्षक यांची स्वच्छ, पारदर्शक आणि कर्तव्यदक्ष अधिकारी अशी जिल्ह्यात चांगली प्रतिमा आहे. त्यामुळे गायरान जमिनीवर नियमबाह्य पद्धतीने उभारण्यात येणारे सौर ऊर्जा प्रकल्प तसेच बेकायदेशीर वाळू उपसा करणाऱ्या माफियांविरुद्ध कठोर, निष्पक्ष आणि ठोस कारवाई होईल, अशी सर्वसामान्य नागरिकांची अपेक्षा आहे.गेल्या काही दिवसांत गायरान धारक, भूमिहीन व गोरगरीब कास्तकऱ्यांवर अन्याय होत असल्याच्या तक्रारी पुढे येत आहेत. या पार्श्वभूमीवर प्रशासनाने कोणाच्याही दबावाला बळी न पडता कायद्याचे राज्य प्रस्थापित करावे. नियम डावलणाऱ्यांवर कारवाई करून गरीबांना न्याय देणे हीच प्रशासनाच्या विश्वासार्हतेची खरी कसोटी ठरेल.**

## प्रभाग २५ मधील विकासकामे सुरू केली स्वखर्चातून जनतेची सेवा करण्याचं भाग्य मोठं–अजिंक्य शिराळे

बीड दि १८(प्रतिनिधी)- बीड नगर परिषदेच्या प्रभाग २५ मधील भाजपचे उमेदवार अजिंक्य बाबुराव शिराळे यांनी पुढाकार घेऊन परिसरातील रस्ते साफसफाईचे काम केले आहे.या भागात ४० फुटी रस्ता असूनही वाढलेल्या बाभळी आणि कचऱ्यामुळे तो केवळ १० फुटांचा उरला होता, जो आता मोकळा करण्यात आला आहे.



अजिंक्य बाबुराव शिराळे यांनी २०२५ च्या बीड नगर परिषद निवडणुकीत प्रभाग २५ मधून भारतीय जनता पक्षाचे अधिकृत उमेदवार म्हणून निवडणूक लढवली होती.निवडणुकीच्या निकाला पेक्षा जनसेवेला प्राधान्य देत, त्यांनी प्रभागातील अरुंद झालेल्या रस्त्यांवरील अतिक्रमणे (बाभळीची झाडे) आणि कचरा हटवण्याचे काम हाती घेतले आहे, जेणेकरून नागरिकांना पूर्ण ४० फुटांचा रस्ता वापरता येईल.प्रभाग २५ मधील हा रस्ता मूळचा ४० फूट रुंद आहे. मात्र, गेल्या अनेक दिवसांपासून या रस्त्यावर मोठ्या प्रमाणात कचरा साचला होता आणि दोन्ही बाजूंनी बाभळीची झाडे वाढली होती. यामुळे रहदारीसाठी केवळ १० फूट जागा शिल्लक उरली होती. आणि वाढलेल्या बाभळींमुळे नागरिकांना सापांची सुद्धा भीती होती. तसेच प्रभाग २५ मधील खांबावरील लाईट ची सोय सुद्धा केली आहे.निवडणुकीचे निकाल काहीही लागले तरी जनतेची सेवा सुरूच ठेवण्याच्या उद्देशाने अजिंक्य शिराळे यांनी स्वतः पुढाकार घेतला. त्यांनी जेसीबी आणि मजुरांच्या साहाय्याने या रस्त्यावरील झाडे–झुडपे आणि कचरा हटवून रस्ता पूर्णपणे मोकळा केला आहे.

## डॉ.भारतभूषण क्षीरसागर यांच्या वाढदिवसानिमित्त जुन्या सदाबहार चित्रपट गीत गायनाचा कार्यक्रम संपन्न

बीड (प्रतिनिधी) : येथील सौ. केशरबाई सोनाजीराव क्षीरसागर ऊर्फ काकू, कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय व संगीत विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने माजी नगराध्यक्ष तथा नवगण शिक्षण संस्थेचे उपाध्यक्ष डॉ. भारतभूषण क्षीरसागर यांच्या वाढदिवसानिमित्त जुन्या सदाबहार चित्रपट गीत गायनाचा कार्यक्रम दिनांक १६ फेब्रुवारी २०२६ रोजी आयोजित करण्यात आला. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शिवानंद क्षीरसागर हे होते. यावेळी महाविद्यालयातील उपप्राचार्य डॉ. अनिता शिंदे व प्रा. सुरेश थोरात यांनी एकत्रितपणे तुम से मिलके हे गीत गायले तर प्रा. जमदाडे दिपक यांनी पल पल दिल के पास हे गीत गायले. प्रा. पवन शिंदे यांनी ये जिंदगी गले लगाले हे गीत सादर केले. डॉ. श्रीमंत तोंडे व डॉ. अनिता शिंदे यांनी मराठी चित्रपटातील चोरीचा मामला मामा ही थांबाला ही प्रसिध्द गीत गायले. डॉ. चौधरी व्ही. एम. यांनी तुझ से नाराज नहीं जींदगी हे गीत गायले. डॉ. शंकर राऊत यांनी तुम संग प्रित लगाई सजना हे गीत गायले. तसेच महाविद्यालयाची विद्यार्थीनी कु. श्रेया सरकटे हिने शारद सुंदर चंदेरी राती हे गीत गायले तसेच कैवल्य सुरवसे याने गुलाबी आँखे व मेरे सपनों की रानी हे गीत गाऊन उपस्थितानां मंत्रमुग्ध केले.

## स्व.बाळासाहेब ठाकरे आरोग्य रत्न पुरस्कार डॉ दिपक राऊत यांना जाहीर

बीड (प्रतिनिधी) राज्य शासनाचा आरोग्य सेवेतील वंदनीय बाळासाहेब ठाकरे आरोग्य रत्न पुरस्कार बीड येथील डॉ. दिपक शिवाजीराव राऊत यांना जाहीर झाला आहे. वृद्धत्व आरोग्य व मानसिक आजार केंद्र, लोखंडी सावरगाव ता. अंबाजोगाई येथे डॉक्टर राऊत कार्यरत आहेत. यशवंतराव चव्हाण सभागृह मंत्रालय मुंबई येथे २२ जानेवारी २०२६ रोजी पुरस्कार वितरण सोहळा होणार आहे. यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री तथा बीड जिल्ह्याच्या पालकमंत्री सुनेत्राताई पवार, आरोग्य मंत्री प्रकाश आबिटकर आदी उपस्थित राहणार आहेत. यावेळी डॉ. राऊत यांचा सहकुटुंब सत्कार करण्यात येणार आहे. आरोग्य सेवेमध्ये उल्लेखनीय कार्य केल्याबद्दल शासनाच्या वतीने हा पुरस्कार दिला जातो.

पुरस्कार जाहीर झाल्याबद्दल डॉ. दीपक राऊत यांचे जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. सतीश कुमार सोळुंके, डॉ. लक्ष्मीकांत तांदळे, डॉ. मुजाहिद, डॉ. शहाणे, डॉ. सुधीर राऊत, डॉ. अरुणा दहिफळे, एस. जी. राऊत आदींनी अभिनंदन केले आहे.

## छत्रपती शिवाजी महाराज जयंती उत्सव समितीकडून रक्तदान शिबिर संपन्न



पाटोदा दि १८ (प्रतिनिधी)– छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंती निमित्त सार्वजनिक शिवजयंती उत्सव समितीच्या वतीने भव्य रक्तदान व सर्व रोग निदान शिबिराचे आयोजन करण्यात आले. सामाजिक बांधिलकी जपत आयोजित या उपक्रमाला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

शिबिरामध्ये मोठ्या संख्येने युवक–युवतींनी स्वेच्छेने रक्तदान करून मानवतेचा संदेश दिला. तसेच सर्वसामान्य नागरिकांसाठी मोफत आरोग्य तपासणी करण्यात आली. विविध आजारांचे निदान, हाडे,रक्तदाब, शुगर,हिमोग्लोबिन तपासणी आदी सेवा तज्ज्ञ डॉक्टरांकडून देण्यात आल्या.समितीच्या पदाधिकाऱ्यांनी सांगितले की, छत्रपतींच्या विचारांचा आदर्श डोळ्यासमोर ठेवून समाजोपयोगी उपक्रम राबविण्याचा आमचा प्रयत्न आहे. रक्तदान हेच जीवनदान असून प्रत्येकाने अशा उपक्रमात सहभागी व्हावे, असे आवाहन यावेळी करण्यात आले. सार्वजनिक शिवजयंती उत्सव समितीचे अध्यक्ष नगरसेवक संतोष जाधव यांनी कार्यक्रमाला उपस्थित राहिलेल्या सर्व रक्तदाते,नागरिक, डॉक्टर व कार्यकर्त्यांचे मनःपूर्वक आभार मानले.कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी उत्सव समितीचे पदाधिकारी, कार्यकर्ते व वैद्यकीय पथक यांनी परिश्रम घेतले.

## घरकुलचे हप्ते वेळेवर आणि जिओ टॅगिंग लवकर द्या – जिल्हाध्यक्ष राणा चव्हाण



अंबाजोगाई दि १८ (प्रतिनिधी)– घरकुलचे हप्ते वेळेवर पडत नाहीत, त्यामुळे घरकुल लाभार्थी आर्थिक अडचणीत आले आहेत. तसेच पंचायत समितीचे एमआरईजीएस विभागातील इंजिनिअर गायगोठा, जलसिंचन विहीर व इतर योजनांचा शेतकऱ्यांना फायदा घेण्यासाठी जिओ टॅगिंगला वेळेवर येत नाहीत, ज्यामुळे शेतकऱ्यांसमोर समस्या निर्माण होत आहे. आणि पंचायत समिती, अंबाजोगाईच्या अंतर्गत इतर ही अनेक समस्यांचा सामना नागरिकांना करावा लागत आहे, ज्यामुळे शेतकऱ्यांना त्रास होत आहे. तरी या संदर्भात पंचायत समिती प्रशासनाने तात्काळ कार्यवाही करावी. अशी मागणी अखिल भारतीय भ्रष्टाचार निर्मूलन संघर्ष समितीचे जिल्हाध्यक्ष राणा चव्हाण यांनी व नागरिकांनी गटविकास अधिकारी यांना सोमवारी दिलेल्या निवेदनातून केली आहे.

अखिल भारतीय भ्रष्टाचार निर्मूलन संघर्ष समितीचे राष्ट्रीय अध्यक्ष प्रदीपराव पाटील खंडापूरकर (बाबा) यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हाध्यक्ष राणा चव्हाण यांनी गटविकास अधिकारी, पंचायत समिती, अंबाजोगाई यांना सोमवार, दिनांक १६ फेब्रुवारी रोजी दिलेल्या निवेदनातून एका अत्यंत महत्त्वाच्या विषयाकडे शासन व प्रशासनाचे लक्ष वेधले आहे. जिल्हाध्यक्ष चव्हाण यांनी सोमवारी दिलेल्या निवेदनात नमूद केले आहे की, वरील सर्व प्रकारणामुळे पंचायत समिती, अंबाजोगाईच्या अंतर्गत इतर ही अनेक समस्यांचा सामना नागरिकांना करावा लागत आहे, ज्यामुळे शेतकऱ्यांना त्रास होत आहे. सदरील निवेदनाच्या प्रती माहितीस्तव जिल्हाधिकारी, बीड आणि तहसीलदार, अंबाजोगाई यांना देण्यात आलेल्या आहेत. सदरील निवेदनावर बीड जिल्हाध्यक्ष राणा चव्हाण, जिल्हा कार्याध्यक्ष जहाँगीर पठाण, शहराध्यक्ष ऋषिकेश मोरे, सरपंच अंबादास हारकळ, विजयानंद सोळंके, विजय चव्हाण, सुधीर उपाडे, ओमकार चव्हाण, दयानंद गुजर यांच्या स्वाक्षऱ्या आहेत. यासंदर्भात आमच्या प्रतिनिधीशी बोलताना जिल्हाध्यक्ष राणा चव्हाण यांनी सांगितले

## परळीतील युनिक क्युरियस किड्स स्कुल येथे छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती उत्साहात साजरी

परळी वैजनाथ (प्रतिनिधी ) :– शहरातील युनिक क्युरियस किड्स या प्री–प्रायमरी शाळेमध्ये छत्रपती शिवाजी महाराजांची जयंती मोठ्या उत्साहात व भक्तिभावाने साजरी करण्यात आली. यावेळी संपूर्ण शाळा शिवमय वातावरणात न्हाऊन निघाली होती. कार्यक्रमाची सुरुवात विद्यार्थ्यांच्या पारंपरिक वेशभूषेने सजलेल्या भव्य रॅलीने झाली. सर्व विद्यार्थ्यांनी शिवकालीन पोशाख परिधान करून शाळेच्या परिसरात जयंती रॅली काढली. जय भवानी, जय शिवाजीच्या जयघोषाने परिसर दुमदुमून गेला. चिमुकल्या विद्यार्थिनींनी लाठी–काठीचे आकर्षक प्रात्यक्षिक सादर करून उपस्थितांची मने जिंकली. विद्यार्थ्यांनी शिवरायांचा जयघोष आणि मुजरा सादर करत कार्यक्रमात रंगत आणली. शिक्षकांनीही उत्साहाने सहभाग नोंदवत वातावरण अधिक जोशपूर्ण केले.

कार्यक्रमादरम्यान संस्थेच्या संचालिका सौ. पूजा सारडा मॅडम यांनी छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. आपल्या मनोगतात त्यांनी विद्यार्थ्यांना शिवरायांचे शौर्य, स्वाभिमान आणि देशप्रेम या गुणांचे महत्त्व सांगितले. हा प्रेरणादायी कार्यक्रम विद्यार्थ्यांमध्ये इतिहासाबद्दल अभिमान आणि देशभक्तीची भावना जागवणारा ठरला.

## विश्व इंग्लिश स्कूल, उक्कडपिंप्री येथे शिवजन्मोत्सव उत्साहात

बीड (प्रतिनिधी): विश्व इंग्लिश स्कूल, उक्कडपिंप्री ता.गेवराई जि.बीड येथे रयतेचा राजा छत्रपती शिवाजी महाराजांचा जन्मोत्सव उत्साहात साजरा करण्यात आला. विद्यार्थ्यांनी बालशिवाजी, वीर माता जिजाऊ व मावळे यांची वेशभूषा परिधान केली होती. यावेळी शाळेच्या उपमुख्याध्यापिका सौ.भारती करपे यांनी वीर छत्रपती शिवाजी महाराजांच्या बालपणीच्या यशोगाथाबद्दल विद्यार्थ्यांना सांगितले. श्री. हरी कुंडरे सरांनी छत्रपती शिवाजी महाराजांनी केलेल्या लढाया व जिंकलेले किल्ले याबद्दल सांगितले.बाल शिवाजीच्या लहानपणीच्या गोष्टींना सारिका जोगदंड मॅडम यांनी उजाळा दिला. मध्ययुगीन भारताला नवी दिशा दिली या बद्दल शितल शेळके मॅडम यांनी सांगितले. यावेळी सौ.पायल माने व सौ.मंजुषा सामसे यांनी वीर माता जिजाऊ यांच्या प्रयत्नातून छत्रपती शिवाजी महाराज कसे घडले व त्यांनी मावळ्यांचे संघटन कसे केले, याबद्दल विद्यार्थ्यांना सांगितले .



## रत्नाबाई कळसे यांचे निधन

नांदेड दि.१८(प्रतिनिधी):– शहरातील स्वामी विवेकानंद नगरातील ज्येष्ठ नागरिक रत्नाबाई दशरथराव कळसे (वय ९८) यांचे दि.१८ फेब्रुवारी रोजी सकाळी वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर सायंकाळी गोवर्धनघाट स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात एक मुलगा, दोन मुली, नातवंडे, पतवंडे असा मोठा परिवार आहे. बाबुराव कळसे यांच्या मातोश्री तर बजरंग दलाचे पदाधिकारी अमित कळसे, कवयित्री सुवर्णा कळसे यांच्या त्या आजी होत. रत्नाबाई कळसे या अन्नपूर्णामाता म्हणून नजिकच्या वर्तुळात परिचित होत्या.

# पाटोद्यात महावितरणचा गलथान कारभार

## शिवजयंतीच्या पार्श्वभूमीवरही वीजपुरवठ्यात खंड

पाटोदा (प्रतिनिधी) : पाटोदा शहरात छत्रपती शिवाजी महाराज जयंतीनिमित्त गेल्या तीन-चार दिवसांपासून विविध सांस्कृतिक व सामाजिक कार्यक्रमांचा उत्साह उसळलेला असताना महावितरणच्या निष्काळजी आणि गलथान कारभारामुळे नागरिकांना मोठ्या गैरसोयीला सामोरे जावे लागले आहे. शिवजयंतीच्या पार्श्वभूमीवर किमान काही दिवस तरी वीजपुरवठा सुरळीत ठेवावा, अशी प्रशासनाची स्पष्ट सूचना असूनही त्याकडे दुर्लक्ष झाल्याने संताप व्यक्त होत आहे.

पाटोद्यातील तहसीलदार दत्तात्रय निलावाड, पाटोदा पोलीस ठाण्याचे अधिकारी तसेच विविध शिवजयंती उत्सव मंडळांनी महावितरणकडे विनंती करून जयंतीचे सर्व कार्यक्रम पूर्ण होईपर्यंत कोणत्याही भागातील वीजपुरवठा खंडित करू नये, अशी मागणी केली होती. मात्र या सूचनांना न जुमानता जयंतीच्या आदल्या दिवशी देखभाल दिनाच्या नावाखाली दिवसभर वीजपुरवठा बंद ठेवण्यात आला.

यावरच न थांबता बुधवारी सायंकाळी कार्यक्रम सुरू असतानाच अचानक वीजपुरवठा खंडित करण्यात आला. त्यामुळे व्यासपीठावरील कार्यक्रम, ध्वनिव्यवस्था आणि प्रकाशयोजना ठप्प झाली. नागरिक, महिला, ज्येष्ठ नागरिक आणि लहान मुले अंधारात अडकून पडल्याने संतापाची लाट उसळली.सणासुदीच्या दिवशीही वीजपुरवठा नियमित ठेवता येत नसेल, तर प्रशासनाच्या सूचनांचे काय मूल्य, असा प्रश्न उपस्थित होत आहे. वारंवार तक्रारी करूनही परिस्थितीत कोणताही बदल न झाल्याने नागरिकांमध्ये नाराजी वाढली आहे.या संपूर्ण प्रकाराबाबत जबाबदार अधिकाऱ्यांवर तात्काळ कारवाई करावी आणि भविष्यात अशा प्रकारची पुनरावृत्ती होऊ नये यासाठी ठोस उपाययोजना कराव्यात, अशी मागणी सर्वसामान्य जनतेतून जोर धरत आहे. शिवजयंती सारख्या अभिमानाच्या दिवशी पाटोद्यात निर्माण झालेल्या या अंधारामुळे महावितरणच्या कार्यपद्धतीवर गंभीर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे.

# दुचाकीस्वाराला चाकूचा धाक दाखवून भर दिवसा लुटले

केज दि १८ (प्रतिनिधी)- दुचाकीवरुन जाणाऱ्या एका स्वाराला चाकूचा धाक दाखवून गळ्यातील सोन्याचे लॅकेट लुटून चोरटे पसार झाल्याची घटना बुधवारी दि.१८ सकाळी १०.३० वाजता केज-कळंब रस्त्यावर सुर्डीपाटी येथे घडली आहे. भरदिवसा घडलेल्या या घटनेमुळे परिसरात खळबळ उडाली आहे. चोरटे सीसीटीव्हीत कैद झाले असून त्या आधारे युसुफ वडगाव पोलीस त्यांचा शोध घेत आहेत.

याबाबत समजलेली माहिती अशी की, सेवानिवृत्त वाहन चालक भिसे (पूर्ण नाव समजू शकले नाही) हे दुचाकीवरून जात असताना त्यांना दोघा अनोळखी व्यक्तींनी अडवून त्यांच्या गळ्याला चाकू लावला भिसे यांच्या गळ्यातील सैन्याची चैन घेऊन पसार झाले.

ही घटना सकाळी १०:३० च्या सुमारास भरदिवसा आणि वर्दळीच्या ठिकाणी सुर्डीपाटी येथे घडली आहे. हे दोन्ही चोरट्यांनी हेल्मेट लावलेले होते. ते सीसीटीव्ही कॅमेऱ्यात कैद झाले आहेत. या घटनेची माहिती मिळताच युसुफ वडगाव पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक यांनी कर्मचाऱ्यांसह घटनास्थळी धाव घेतली. या घटनेची माहिती घेऊन सीसीटीव्ही फुटेज हस्तगत करुन त्या आधारे चोरट्यांचा माग काढण्यास सुरुवात केली आहे.

# पशूमेळावे, प्रदर्शनांपेक्षा शेतकऱ्यांच्या खात्यात नुकसान भरपाई जमा करा - वसंत मुंडे

परळी (प्रतिनिधी) - महाराष्ट्र राज्यातील त्रिमूर्ती सरकारने शेतकऱ्यांच्या हितासाठी केवळ कृषी प्रदर्शन व पशुसंवर्धन मेळावे आयोजित करून चालणार नाही, तर शेतीमालाला किमान आधारभूत किंमत, पिकविमा योजनांची प्रभावी अंमलबजावणी तसेच बोगस खते, बी-बियाणे, कीटकनाशके व औषधांमुळे होणाऱ्या नुकसानीसंदर्भात तात्काळ नुकसान भरपाई देण्यासाठी कठोर कायदा करावा आणि त्याची प्रभावी अंमलबजावणी करावी, अशी ठाम मागणी महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटी ओबीसी विभागाचे प्रदेश उपाध्यक्ष वसंत मुंडे यांनी शासनाकडे केली आहे.

शेतकऱ्यांच्या हितासाठी केंद्र व राज्य सरकारच्या विविध योजना कागदोपत्री अस्तित्वात असल्या तरी प्रत्यक्षात त्या योजनांची अंमलबजावणी करताना गंभीर त्रुटी आढळतात. संबंधित खात्यांचे काही कर्मचारी, अधिकारी तसेच मंत्री कार्यालयात टक्केवारीशिवाय कामांना मंजुरी मिळत नाही, असा गंभीर आरोपही वसंत मुंडे यांनी केला आहे. या परिस्थितीमुळे शेतकरी न्यायापासून वंचित राहत असून त्यांना वेळेवर मदत मिळत नाही. राज्यात विविध ठिकाणी पशुसंवर्धन व कृषी प्रदर्शन मेळावे आयोजित केले जात आहेत. मात्र, जनतेच्या कररूपाने मिळणाऱ्या पैशांचा योग्य वापर न होता, केवळ प्रदर्शन, मेळावे व योजनांचे आकर्षक सादरीकरण करून निधीचा दुरुपयोग होत असल्याचा आरोप करण्यात आला आहे. या माध्यमातून काही प्रशासकीय अधिकारी, लोकप्रतिनिधी व मंत्री कार्यालयांमध्ये टक्केवारी घेतली जाते आणि त्यामुळे प्रत्यक्ष जनहिताच्या योजनांची अंमलबजावणी नियमांनुसार होत नाही, असेही त्यांनी नमूद केले.

शेतीमध्ये नवे तंत्रज्ञान, सुधारित खते व बी-बियाणे, तसेच पशुसंवर्धनाशी संबंधित नवीन प्रयोग व शासकीय योजना यांची माहिती प्रसारमाध्यमांद्वारे आणि संबंधित विभागांमार्फत थेट शेतकऱ्यांपर्यंत पोहोचवली पाहिजे. परंतु केवळ निधी खर्च करण्याच्या उद्देशाने मेळावे आयोजित केले जात असल्याची भावना जनतेत निर्माण झाली आहे, असेही वसंत मुंडे यांनी स्पष्ट केले.

शेतकऱ्यांच्या आर्थिक सुरक्षिततेसाठी आणि त्यांना न्याय मिळवून देण्यासाठी तात्काळ ठोस कायदे व पारदर्शक अंमलबजावणी हीच काळाची गरज असल्याचे त्यांनी शेवटी अधोरेखित केले.

# तलवाडा येथील मुख्य रस्त्यावरील मास विक्री बंद करावी - हभप गणेश कचरे



तलवाडा दि.१८ (प्रतिनिधी): गेवराई तालुक्यातील मौजे तलवाडा येथे लाखो लोकांचे श्रद्धास्थान असलेले श्रीक्षेत्र त्वरितादेवी चे मंदिर असून मंदिरावर दर्शनासाठी ज्या रस्त्याने लोकांना जावे लागते त्याच रस्त्यावर मास विक्रीची दुकाने असून हि मास विक्री अक्षरशः उघड्यावर सुरू आहे. श्रीक्षेत्र त्वरितादेवी मंदिर, छत्रपती शिवाजी महाराज चौक, पुरातण समाधी मंदिर व भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर पुर्णाकृती पुतळा यादरम्यान मास विक्रीची दुकाने थाटलेली आहेत. या रस्त्यावर उघड्यावर सुरू असलेली मास विक्री तलवाडा ग्रामपंचायतीने बंद करून त्यांना एका बाजूला कुठेतरी स्वतंत्र जागा उपलब्ध करून द्यावी अशी मागणी हभप गणेश महाराज कचरे यांनी केली आहे. उघड्यावर सुरू असलेल्या मास विक्रीचा सर्वच समाजातील लोकांना त्रास होत आहे. तसेच धार्मिक कार्याला देखील अडथळा निर्माण होत आहे. या मास विक्रीमुळे दुर्गंधी सुध्दा पसरू लागलेली आहे. त्यामुळे याची ग्रामपंचायतीने तात्काळ दखल घेऊन मुख्य रस्त्यावर सुरू असलेली मास विक्री बंद करावी नसता कायदेशीर मार्गाने आंदोलन करण्यात येईल असा इशारा देखील हभप गणेश महाराज कचरे यांनी दिला आहे.

# जि.प.शाळा हरीलाल नाईक तांडाच्या व्यवस्थापन समिती अध्यक्षपदी छगन राठोड



गेवराई दि १८(प्रतिनिधी) : जिल्हा परिषद प्राथमिक शाळा हरिलाल नाईक तांडा गेवराई या शाळेच्या व्यवस्थापन समितीचे गठन करण्यात आले असून, अध्यक्षपदी छगन मोतीराम राठोड तर सचिवपदी मुख्याध्यापक भडके सर, उपाध्यक्षपदी नवनाथ दिना चव्हाण यांची सर्वांमध्ये बिनविरोध निवड करण्यात आली आहे.

गेवराई तालुक्यातील हरीलाल नाईक तांडा येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेतील शाळा व्यवस्थापन समितीचे दिनांक १८ फेब्रुवारी २०२६ रोजी गठन करण्यात आले आहे. या समितीच्या अध्यक्षपदी छगन मोतीराम राठोड, सचिवपदी शाळेचे मुख्याध्यापक फडके सर तर उपाध्यक्षपदी नवनाथ दिना चव्हाण यांची सर्वानुमते निवड करण्यात आली. या पुढील काळात शाळा सुंदर व सुसज्ज करण्यासोबतच येथील विद्यार्थ्यांच्या उज्वल भविष्यासाठी विविध शैक्षणिक सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी आपण प्रयत्न करणार असल्याचे अध्यक्ष छगन राठोड आणि उपाध्यक्ष नवनाथ चव्हाण यांनी सांगितले. याप्रसंगी कैलास राठोड, रघुनाथ राठोड, जीवन राठोड, ज्ञानेश्वर राठोड, रमेश राठोड, विकास राठोड,संतोष चव्हाण यांच्यासह शाळेतील पवार सर, काळे सर, सपाटे सर, घोडके सर, कुलगुडे सर, श्रीमती देवडे मॅडम, श्रीमती नदाडे मॅडम, अंगणवाडी सेविका संगीता राठोड, मीरा चव्हाण, मीरा विजय राठोड यांच्यासह गावातील प्रतिष्ठित नागरिक व महिलावर्ग बहुसंख्येने उपस्थित होते.

# पाटोदा तालुक्यात खेड्यापाड्याने चोऱ्याचे सत्र चालू

## जवळाला येथे व्यापाऱ्याच्या घरी १० लक्ष रुपयांची चोरी

पाटोदा दि १८ (अ कादर मकरानी)- पाटोदा तालुक्यात खेड्यापाड्यात चोरट्यांनी उच्छाद मांडला असून अनेक ठिकाणी चोऱ्या होत आहे तालुक्यातील धनगर जवळका पाचेगाव सोबतच आता. पाटोदा तालुक्यातील जवळाला येथील भुसार मालाचे व्यापारी पोपट मच्छिंद्र कोठुळे यांच्या घरी चोरांनी ९ लाख रोख रकमेसह सोन्या नाण्याचे दागीने असा एकुण ९ लक्ष ९० हजार रुपयाचा ऐवज लंपास केल्याची घटना मंगळवार रात्री १२ ते पहाटे ४ च्या दरम्यान घडली.

पोपट कोठुळे हे शेतकरी असुन शेतीला जोडधंदा म्हणून गावातच आडत टाकुन भुसार माल खरेदीचा व्यवसाय करतात. त्यांनी चार दिवसापुर्वी सोयाबीन मोठ्या प्रमाणात खरेदी केले होते . खरेदी केलेले सोयाबीनची विक्री केल्यानंतर त्यांनी सर्व रक्कम पाटोदा येथील एचडीएफसी बँकेतील आपल्या खात्यात टाकळी होती. मंगळवारी खरेदी केलेल्या मालाचे सर्वांना पैसे देण्याचे त्यांनी ठरवले होते . त्या उद्देशाने त्यांनी दि .१६ रोजी एचडीएफसी बँकेच्या पाटोदा शाखेतुन त्यांनी ७ लक्ष रु . ची रक्कम काढली . जवळ असलेले २ लक्ष रु . घरातील कपाटात ठेवले व कपाट लॉक करून किल्ली कपाटावर ठेवली .व घराला कुलुप लावुन घरातील सर्व सदस्य दुसऱ्या रुम मध्ये झोपले होते.


दि. १६ रोजी चे रात्री १२ ते दि. १७रोजी चे पहाटे ४चे दरम्यान अज्ञात चोरट्याने घराचे कुलुप तोडुन घरामध्ये प्रवेश करून कपाटाचे वर ठेवली चावी चोरट्याने घेवुन कपाट उघडुन पिशवी मध्ये ठेवलेले ९ लाख रू. नगदी व ९० हजार रुपये किमतीचे सोन्या नाण्याचे दागिने असा ९ लक्ष ९० हजार रुपयाचा ऐवज चोरांनी लंपास केला. घरातील सर्व सदस्य सकाळी ५ वाजेच्या झोपेतुन उठताच त्यांना चोरी झाल्याचे निदर्शनास आले. पोपट मच्छींद्र कोठुळे यांच्या फिर्यादीवरून पाटोदा पोलीस ठाण्यात अज्ञात चोराविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# सौ.के. एस.के.महाविद्यालयाच्या अमित राठोडची व्हीझी क्रिकेट ट्रॉफी स्पर्धेसाठी निवड

बीड (प्रतिनिधी) : सौराष्ट्र विद्यापीठ राजकोट येथे झालेल्या पश्चिम विभागीय अंतर विद्यापीठ स्पर्धेतून पश्चिम विभागीय संघ घोषित करण्यात आला असून डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ छत्रपती संभाजी नगर संघातून सौ.के .एस .के. महाविद्यालयाचा क्रिकेट खेळाडू अमित राठोड याने या स्पर्धेत विद्यापीठाच्या संघातून उत्कृष्ट कामगिरी केली या कामगिरीच्या जोरावर पश्चिम विभागीय विद्यापीठ संघात फलंदाज म्हणून निवड झाली आहे .सौराष्ट्र विद्यापीठ राजकोट येथे पुढील स्पर्धेच्या तयारी साठी सराव शिबिरात सराव करत आहे.

२८ फेब्रुवारी पासून विझी क्रिकेट ट्रॉफी स्पर्धा गोव्यात आयोजित केली जाणार असून ही एक अंतर विभागीय विद्यापीठ एकदिवसीय पुरुष क्रिकेट स्पर्धा असून अखिल भारतीय विद्यापीठ खेळ संघटन(-खण) व भारतीय क्रिकेट बोर्ड(इउउख) यांच्या सहकार्याने ही स्पर्धा आयोजित केली जाते या स्पर्धेतून विद्यापीठ स्तरावरील तरुणांना त्यांच्या प्रतिभेला राज्य आणि राष्ट्रीय संघामध्ये स्थलांतरित करण्यासाठी ही एक स्पर्धा प्रमुख व्यासपीठ म्हणून काम करते यामध्ये देशाचे चार विभाग उत्तर दक्षिण पूर्व पश्चिम विभागीय विद्यापीठ संघामध्ये हे सामने खेळले जातात या स्पर्धा गोवा क्रिकेट असोसिएशन अकादमी पोरवोरिम आणि पणजी जिमखाना मैदान पणजी येथे होणार आहेत.

अमित राठोड याने क्रीडा क्षेत्रात मिळवलेल्या यशाबद्दल क्रीडा संस्कृती जोपासणारी संस्थेचे उपाध्यक्ष डॉ.भारतभूषण क्षीरसागर सहसचिव ,प्राचार्या डॉ. दीपाताई क्षीरसागर ,सचिव डॉ.योगेश भैय्या क्षीरसागर, डॉ.सारिकाताई क्षीरसागर, संस्थेचे प्रशासकीय अधिकारी डॉ. सुधाकर गुट्टे डॉ. विश्वंभर देशमाने महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.शिवानंद क्षीरसागर महाविद्यालयातील उपप्राचार्य डॉ अनिता शिंदे, क्रीडा विभाग प्रमुख डॉ. भागचंद सानप व शिक्षक व शिक्षक इतर कर्मचारी विद्यार्थी यांनी खेळाडूचे अभिनंदन करून पुढील स्पर्धेत शुभेच्छा दिल्या.




## जाहीर प्रगटन

**मा.श्री.एम.ए.शिंदे, दिवाणी न्यायाधीश, क. स्तर, पाटोदा, ता. पाटोदा, जि. बीड यांच्या न्यायालयात**

किरकोळ दि.अर्ज ७३/२०२६ विजयकुमार व इतर विरुध्द निरंक मार्फत : ॲड.एस.बी.थोरवे

**अर्जदार :** १) विजयकुमार पि.अमृतराव बांगर, वय ४२ वर्षे, धंदा नोकरी. २) मंगल भ्र. प्रभाकर गोपाळघरे, वय ७६ वर्षे, धंदा घरकाम. ३) सुभद्राबाई भ्र. भुजंगराव सानप, वय ५१ वर्षे, धंदा घरकाम. ४) सिलावती भ्र. वसंत पाखरे, वय ५२ वर्षे, धंदा घरकाम. ५) संगिता भ्र. महादेव गिते, वय ५० वर्षे, धंदा घरकाम. ६) बायसाबाई भ्र. शामराव गोपाळघरे, वय ७६ वर्षे, धंदा घरकाम.

**अर्जदार :** अर्जदार क्र.१ व ४ रा. भायाळा ता. पाटोदा जि.बीड. अर्जदार क्र.२ रा. घुलेवाडी ता. भूम जि. धाराशिव. अर्जदार क्र.३ पौडुळ ता. शिरुर का. जि. बीड. अर्जदार क्र.५ रा पांढरेवाडी ता. जामखेड जि. अ.नगर. अर्जदार क्र.६. रा. भक्ती कन्स्ट्रक्शनजवळ, भाग्योदय कॉलनी, बीड.

विरूध्द निरंक

**मागणी अर्ज:** बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम २ नुसार वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत.

वरील अर्जदार क्र.१ ते ६ यांनी या न्यायालयात मयत **गंगुबाई भ्र. अमृतराव बांगर** याचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र मिळवण्यासाठी अर्ज केला आहे.

ज्याअर्थी **गंगुबाई भ्र.अमृतराव बांगर** यांचा मृत्यु दिनांक ०९/०९/२०२५ रोजी भायाळा, ता. पाटोदा, जि. बीड येथे झाला असुन अर्जदार क. १ हा मयताचा मुलगा असून अर्जदार क्र.२ ते ६ हया मयताच्या विवाहीत मुली आहेत

वरील अर्जदारास शासकीय व निमशासकीय कामाकरीता व इतर कार्यालयीन उपयोगाकरीना वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे.

त्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरहु अर्जदार सदरह मयताचे वारस नव्हेत अथवा त्यांच्या व्यतिरीक्त इतर कोणी मयताचे वारस आहेत असे कोणास समजाविण्याचे असेल तर या जाहिरनाम्याने तारखेपासुन एक महिन्याचे आत त्यांनी या कोर्टात हजर होवुन आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहु मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहू कोर्ट सदरहु अर्जदार हयांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवुन, त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरह

मयत **गंगुबाई भ्र.अमृतराव बांगर** यांचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र देण्यात येईल याची नोंद घ्यावी. आज दिनांक १३ फेब्रुवारी २०२६ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले सदर प्रकरणाची **पुढील तारीख दि. ३० मार्च २०२६.**

आदेशावरुन
सहाय्यक अधिक्षक दिवाणी न्यायालय
क.स्तर, पाटोदा ता.पाटोदा जि.बीड.

क.लिपीक

# आनंदऋषीजी हॉस्पिटल येथे मोफत नेत्र तपासणी शिबिर

बीड दि १८(प्रतिनिधी)- शहरातील प्रसिद्ध उद्योगपती संतोष रमणलाल बोथरा व त्यांच्या पत्नी सौ. सारिका संतोष बोथरा यांनी आपल्या लग्न वाढदिवसानिमित्त एक आगळावेगळा सामाजिक उपक्रम राबविण्याचा संकल्प केला आहे. वाढदिवसानिमित्त मोफत नेत्र तपासणी शिबिराचे आयोजन केले आहे.

सदर शिबिर आनंद ऋषीजी हॉस्पिटल बीड येथे सकाळी दहा ते सायंकाळी सहा दरम्यान दि. २१ व २३ फेब्रुवारी आयोजित केले आहे रोजी या दोन दिवसांत बीड शहर व आजूबाजूच्या परिसरातील दीडशेपेक्षा जास्त नेत्र रुग्णांची तपासणी करण्याचा बोथरा परिवाराचा संकल्प आहे. लग्न वाढदिवस धूमधडाक्यात साजरा करण्याऐवजी समाजहिताचा विचार करून रुग्णसेवेचा संकल्प करणारा हा उपक्रम समाजासाठी आदर्श ठरत आहे. या शुद्ध व प्रेरणादायी कार्याबद्दल बोथरा परिवाराचे सर्व स्तरांतून स्वागत होत आहे.तरी गरजू नेत्र रुग्णांनी या मोफत शिबिराचा लाभ घ्यावा असे आवाहन सकल जैन समाज बीड तसेच बोथरा परिवार यांच्या वतीने करण्यात आले आहे.

**मार्कमेमो व सनद हरवला आहे**

**चि.पवन दत्ता जाधव**
रा.राजेगांव तांडा ता. माजलगाव जिल्हा बीड या नावाचा १० वी चा सनद व मार्कमेमो माजलगाव ते वारोळा बस प्रवासात हरवला आहे.तरी कोनास सापडल्यास खालील क्रमांकावर संपर्क साधावा.
**संपर्क: ९०२१५८५४७४**

# पार्श्वभूमी

दि.१९ फेब्रुवारी २०२६ गुरूवार



## शिवजन्मोत्सवानिमित्त रामनगर येथील सप्ताहाची आज



बीड दि.१७ (प्रतिनिधी): छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त १४ वर्षापासून रामनगर येथे अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन केले जाते. आज गुरुवार, १९ फेब्रुवारी रोजी दुपारी १ ते ३ यावेळेत श्री क्षेत्र रामगड संस्थानचे मठाधिपती स्वामी योगीराज महाराज यांच्या काल्याच्या कीर्तनाने या सप्ताहाची सांगता होणार असून त्यानंतर महाप्रसाद होणार आहे. तरी पंचक्रोशितील भाविक भक्तांनी मोठ्या संख्येने उपस्थित रहावे, असे आवाहन रामनगर ग्रामस्थांच्यावतीने करण्यात आले आहे. वै.महंत लक्ष्मण महाराज रामगडकर यांच्या उपस्थितीत व शुभहस्ते रामनगर येथे शिवजन्मोत्सवानिमित्त अखंड हरिनाम सप्ताहास सुरुवात झाली. १४ वर्षापासून हा सप्ताह आजही मोठ्या उत्साहात संपन्न होतो. १२ फेब्रुवारी रोजी सप्ताहास प्रारंभ झाला होता, दरम्यान नामांकित महाराज मंडळी यांची कीर्तन सेवा पार पडली. आज गुरुवार, १९ फेब्रुवारी रोजी सकाळी गावातून टाळमृदंगाच्या गजरात छत्रपती शिवाजी महाराज यांची भव्य मिरवणूक निघणार आहे. त्यानंतर रक्तदान शिबीर, वृक्षारोपण असे कार्यक्रम होणार आहेत. दुपारी १ ते ३ यावेळेत महंत स्वामी योगीराज महाराज यांचे काल्याचे कीर्तन होणार आणि त्यानंतर महाप्रसाद होणार आहे. तरी पंचक्रोशितील भाविकांनी मोठ्या संख्येने उपस्थित रहावे, असे आवाहन रामनगर ग्रामस्थांच्यावतीने करण्यात आले आहे.

# माजी आ.भीमराव धोंडेंच्या संकल्पनेतुन शेतकऱ्यांसाठी राज्यस्तरीय कृषी प्रदर्शन

२०० पेक्षा अधिक कंपन्या | आधुनिक शेती तंत्रज्ञान | प्रगत खते व बियाणे | तज्ञ मार्गदर्शन | प्रमुख आकर्षक चायनाचा सुलतान

## उपमुख्यमंत्री सुनेत्राताई पवार यांच्या हस्ते होणार उद्घाटन





आष्टी (संजय खंडागळे):- आधुनिक तंत्रज्ञान आणि शेतीपूरक व्यवसायांमुळे ग्रामीण भागासह शहराच्या मतदारसंघाच्या अर्थव्यवस्थेच्या बळकटीकरणासाठी नवे तंत्रज्ञान, नवे विचार आणि समृद्ध शेतीकडे वाटचाल या ध्येयवाक्याने प्रेरित होऊन राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी चे नेते आष्टी विधानसभा मतदारसंघाचे माजी आमदार भीमरावजी धोंडे यांच्या संकल्पनेतून मागील ३ वर्षापासून सलग भव्य कृषी प्रदर्शनाचे आयोजन करण्यात येत असून लाखो नागरिक या प्रदर्शनात भेट देऊन व्यवसायाकडे वळतात याचा बेरोजगार तरुणांसह शेतकरी व नागरिकांना फायदा होतो. याच उद्देशाने सलग तिसऱ्या वर्षी देखील आष्टी येथे राज्यस्तरीय भव्य डॉ.स्वामीनाथन कृषी प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले असून ५ दिवस हे कृषी विषयक प्रदर्शन शेतकऱ्यांसाठी आनंदपर्वणी ठरणार आहे.शेतकऱ्यांनी या प्रदर्शनाचा लाभ घ्यावा असे आवाहन माजी आमदार भीमराव धोंडे यांनी केले आहे. आष्टी येथील बी फार्मसी कॉलेज येथे आयोजित पत्रकार परिषदेमध्ये त्यांनी मंगळवारी दि.१७ फेब्रुवारी रोजी याबाबत माहिती दिली १९ फेब्रुवारी ते २३ फेब्रुवारी दरम्यान भव्य कृषी प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले असून या कृषी प्रदर्शनाचे उपमुख्यमंत्री मा. सुनेत्राताई अजित पवार यांच्या हस्ते उद्घाटन होणार असून राजकीय नेते, विविध क्षेत्रातील मान्यवरांची उपस्थिती राहणार आहे.२०० पेक्षा अधिक कंपन्या, आधुनिक शेती, नवीन तंत्रज्ञान,खते व बियाणे,तज्ञ मार्गदर्शन,प्रदर्शनीमध्ये १००-१५० हून अधिक दालने राहणार असून हे कृषीप्रदर्शन राज्यातील शेतकऱ्यांसाठी आनंद पर्वणी ठरणार आहे.

आष्टीच्या इतिहासात दुष्काळी आष्टी मतदार संघातील शेतकरी व नागरीकांचे जिवनमान उंचावले पाहिजे यासाठी शेतकऱ्यांचे नेते मा.आ. भीमराव धोंडे यांच्या संकल्पनेतून राज्यस्तरीय भव्य कृषी प्रदर्शन सलग तिसऱ्या वर्षी मराठवाड्यातील सर्वात मोठे डॉ. स्वामीनाथन राज्यस्तरीय कृषी प्रदर्शन (वर्ष - ३ रे) भव्य उद्घाटन समारंभ दि. १९ फेब्रुवारी २०२६ रोजी सकाळी ११ वाजता आष्टी येथे पार पडणार आहे.या प्रदर्शनाचे उद्घाटन महाराष्ट्र राज्याच्या उपमुख्यमंत्री तथा बीड जिल्ह्याच्या पालकमंत्री मा. सुनेत्राताई अजित पवार यांच्या हस्ते होणार आहे. कृषी क्षेत्रातील आधुनिक तंत्रज्ञान, जलव्यवस्थापन, पीकपद्धतीतील बदल, सेंद्रिय शेती, पशुसंवर्धन व कृषी प्रक्रिया उद्योग याबाबत सविस्तर मार्गदर्शन या प्रदर्शनात दिले जाणार आहे.कार्यक्रमाला प्रमुख अतिथी म्हणून ना. दत्तात्रय भरणे, मा. ना. पंकजाताई मुंडे, आ.धनंजय मुंडे, आ. प्रकाश सोळंके, माजी आ. अमरसिंह पंडित , माजी आ. बाळासाहेब आजबे, सुरज चव्हाण, राजेश्वर चव्हाण, तुषार पवार, सुरज मांढरे,प्रा. डॉ. इंद्रमणी, विवेक जॉन्सन जिल्हाधिकारी, पप्पू कागदे आदी मान्यवर उपस्थित राहणार आहेत.प्रमुख पाहुणे म्हणून सुनील वानखेडे (विभागीय कृषी सहसंचालक, छ. संभाजीनगर),

पान २ वर

# शेतकरी विरोधी कृषी कराराची परळीत प्रतिकात्मक होळी



परळी दि.१८(प्रतिनिधी):- अमेरिकेसोबत झालेल्या व्यापार कराराबाबत राज्य सरकार शेतकऱ्यांची दिशाभूल करत असल्याने बीड किसान सभेकडून या कराराची प्रतिकात्मक होळी करण्यात आली. परळी तालुक्यातील कावळेवाडी, बोधेगाव या ठिकाणी शेतकऱ्यांनी एकत्र येत या कराराचा तीव्र निषेध केला. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी परळी येथे आयोजित महा एक्स्पो २०२६ पशुप्रदर्शनात भारत-अमेरिका व्यापार कराराचे स्वागत करत अमेरिकेची मोठी बाजारपेठ भारतासाठी खुली झाल्याचे सांगितले होते. या निषेधार्थ किसान सभेच्या आवाहनाला प्रतिसाद देत परळी तालुक्यातील कावळेवाडी, बोधेगाव या ठिकाणी परिसरातील गावातील शेतकऱ्यांनी मंगळवार दि १७ रोजी एकत्र येत या कराराची प्रतिकात्मक होळी केली. सोयाबीन, इथेनॉल, जीएम सोयाबीनपासून तयार खाद्यतेल, पशुखाद्य, सुकामेवा, फळे-भाज्या व पोल्ट्री उत्पादनांवरील सवलतीमुळे भारतीय बाजारपेठेवर विपरीत परिणाम होणार असल्याचा दावा यावेळी उपस्थित शेतकऱ्यांनी केला. सोयाबीनचा हमीभाव ५३३० रुपये असताना शेतकऱ्यांना सुमारे साडेतीन हजार रुपयांत विक्री करावी लागत असल्याचे सांगत

पान २ वर

# शहरातील कॅमेऱ्यांची सुरक्षा रामभरोसे

## उघड्या डीपीमुळे छेडछाडीचा संशय ;तात्काळ कारवाईची मागणी





बीड (प्रतिनिधी):- बीड शहरातील वाढत्या गुन्हेगारी व चोरीच्या घटनांवर आळा घालण्यासाठी मुख्य चौक, प्रमुख रस्ते व संवेदनशील भागात सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यात आले आहेत. मात्र या कॅमेऱ्यांच्या सुरक्षेकडेच, दुरुस्तीकडे दुर्लक्ष होत असल्याचे चित्र सध्या बीड शहरात समोर येत आहे. शहरातील काही चौकांमधील कॅमेरे नादुरुस्त अवस्थेत असल्याचे दिसून येत असून, अनेक ठिकाणी कॅमेऱ्यांखालील डीपी (डिस्ट्रिब्युशन बॉक्स) उघड्या अवस्थेत आहेत. या उघड्या डीपीमुळे वायर कट करणे किंवा इतर प्रकारची छेडछाड होण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे सीसीटीव्ही यंत्रणेचा उद्देशच धोक्यात येण्याची भीती नागरिक व्यक्त करत आहेत.

बीड जिल्ह्यात अलीकडच्या काळात चोरी व गंभीर गुन्ह्यांच्या घटनांमध्ये वाढ होत असल्याच्या पार्श्वभूमीवर पोलीस प्रशासनाने प्रतिबंधात्मक उपाय म्हणून सीसीटीव्ही यंत्रणा उभारली

पान २ वर

# धारदार शस्त्राने तिघांवर हल्ला ; एकाचा मृत्यू

### आष्टी तालुक्यातील रूईनालकोल येथील घटना



आष्टी(प्रतिनिधी):- सोशल मीडियावर एकमेकांच्या विरोधात स्टोरी,स्टेटस टाकण्याच्या कारणावरून कुरापत काढून झालेल्या वादात तिघांवर धारदार शस्त्राने हल्ला करून गंभीर जखमी केले.उपचारासाठी घेऊन जाताना यातील एकाच मृत्यू झाला तर अन्य दोघेजण गंभीर जखमी झाल्याची घटना रूईनालकोल येथे सोमवारी रात्रीच्या दरम्यान घडली. दिपक शिवाजी नालकोल वय वर्ष २० रा.रूईनालकोल ता.आष्टी असे मृताचे नाव आहे.तर जखमींवर अहिल्यानगर येथील खाजगी रूग्णालयात उपचार सुरू आहेत.

आष्टी तालुक्यातील रूईनालकोल येथील जि.प.शाळेच्यासमोर सोमवारी तरूणाच्या दोन गटात इंन्टाग्राम,हॉटसपवर एकमेकांच्या विरोधात स्टोरी टाकण्याच्या कारणावरून वाद झाला.यात वादाच्या दरम्यान एका गटातील तरूणांनी तिघाजणांवर धारदार शस्त्राने हल्ला केल्याने तिघे गंभीर जखमी झाले.जखमी तरूणांना उपचारासाठी घेऊन जाताना दिपक नालकोल यांचा मृत्यू झाल्याची घटना समोर

पान २ वर

# पारधी समाजावर हल्ला करणाऱ्या गावगुंडांना तात्काळ अटक करून समाजाचे पूनर्वसन करा–गायकवाड



गेवराई दि.१७ (प्रतिनिधी) :- तालुक्यातील सुर्डी येथे उदरनिर्वाहासाठी गायरान जमीनीवर झोपडया उभारून वास्तव्य करणाऱ्या अनुसुचित जमातीतील पारधी समाजाच्या मुलांना तुम्ही या शाळेत यायचे नाही म्हणत शाळेतील लहान मुला-मुलींना बाहेर काढून मारहाण करत हाकलून दिले. नंतर पारधी वस्तीवर ३० ते ४० गुंड प्रवृत्तीच्या लोकांच्या जमावाने जिवे मारण्याच्या उद्देशाने तलवार, कुऱ्हाड, कोयते, लाठ्यासह हल्ला चढवला. यामध्ये महिलांचा विनयभंग देखील करण्यात आला. लहान मुलांसह महिला-पुरुष गंभीर जखमी झाले आहेत. त्यांच्यावर जिल्हा रुग्णालय बीड येथे उपचार सुरु असून जखमींच्या जवाबावरुन तसेच घटनास्थळी पंचनामा करत पारधी वस्तीवरील लोकांच्या व स्थानिकांच्या जवाबानुसार तलवाडा

पान २ वर

# अल्पवयीन मुलीच्या शोधासाठी आई-वडिलाचे पोलीस ठाण्यात हेलपाटे

## खंडपीठाच्या आदेशानंतरही तपासाला मिळेना गती

कडा दि.१८(प्रतिनिधी):- गेल्या दोन महिन्यांपासून बेपत्ता झालेल्या पंधरावर्षीय अल्पवयीन मुलीच्या शोधासाठी तिचे आई-वडील अंभोरा पोलीस ठाण्याचे उंबरठे झिजवत आहेत. याबाबत संभाजीनगर खंडपीठात दाद मागितल्यानंतर खंडपीठानेही पोलिसांना अपहृत मुलीला न्यायालयापुढे हजर करण्याचे आदेश दिले आहेत. परंतु न्यायालयाच्या आदेशानंतरही पोलीस तपासात काहीच प्रगती झालेली नसल्याने मुलीचे आई-वडील हतबल झाले आहेत.

आष्टी तालुक्यातील एका गावातील पंधरावर्षीय अल्पवयीन मुलगी दिनांक ७ डिसेंबर २०२५ रोजी बेपत्ता झाली. ही मुलगी वेडसरपणा करत असल्याने एका धार्मिक ठिकाणी तिला आई-वडिलांनी नेले होते. तेथे काम करत असलेला व ओळखीच्या असलेल्या तरुणाची या मुलीशी जवळीक निर्माण झाली. दिनांक ७ डिसेंबर रोजी जेवण करून आई-वडिलांसह झोपलेली मुलगी मध्यरात्री दिसून आली नाही. त्यामुळे आई-वडिलांनी आजूबाजूला व नातेवाईकांकडे शोध घेतला. तसेच संबंधित तरुणाच्या घरी जाऊन माहिती घेतली असता तो तरुणही घरून निघून गेला असल्याचे दिसून आले. त्यामुळे आपल्या मुलीचे संबंधित तरुणाने अपहरण केल्याची खात्री आई-वडिलांना पटली. या घटनेनंतर वडिलांनी अंभोरा पोलीस ठाण्यात दिलेल्या फिर्यादीवरून फूस लावून पळविल्याचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

परंतु पोलिसांना या मुलीचा शोध

पान २ वर

# डॉ.राजकुमार राठोड यांच्या पुस्तकाचे सीसीआरटी उदयपूर येथे राष्ट्रीय स्तरावर प्रकाशन





माजलगांव (प्रतिनिधी) :-महाराष्ट्र शासनाचा राज्य आदर्श शिक्षक पुरस्कार प्राप्त शिक्षक, उच्चविद्याविभूषित संशोधक, लेखक तसेच राष्ट्रीय व राज्यस्तरीय मास्टर ट्रेनर डॉ. राजकुमार राठोड यांच्या बीड जि. प. नासा व इस्त्रो शैक्षणिक सहल निवड परीक्षा सरावसंच या पुस्तकाचा राष्ट्रीय स्तरावरील प्रकाशन सोहळा सांस्कृतिक मंत्रालय, भारत सरकारच्या सांस्कृतिक स्त्रोत एवं प्रशिक्षण केंद्र (सीसीआरटी), उदयपूर (राजस्थान) येथे अत्यंत मान्यवरांच्या उपस्थितीत संपन्न झाला.या पुस्तकाचे प्रकाशन अभिक सरकार (क्षेत्रीय अधिकारी, सीसीआरटी उदयपूर), प्रो. डॉ. हितेश पानेरी (सीसीआरटी, उदयपूर), डॉ. जयप्रकाश शाकद्विपीय (हिंदी राजभाषा विशेषज्ञ, राजस्थान), एच. एस. बीस्ट (उत्तराखंड) तसेच साब्यासाची दास (तेलंगणा) यांच्या शुभहस्ते करण्यात आले. या पुस्तकाचे प्रकाशक आराध्या पब्लिकेशन, माजलगांव,

पान २ वर

# आष्टी व पाटोद्यातील २१०८ उमेदवार देणार आष्टीत परीक्षा

## पोलिस पाटील भरती परीक्षा सुरळीत होणार – उपविभागीय अधिकारी श्रीमती वसीमा शेख



पाटोदा : (महेश बेदरे) :- पोलिस पाटील भरती प्रक्रियेअंतर्गत आष्टी-पाटोदा उपविभागातील लेखी परीक्षा रविवार, २२ फेब्रुवारी रोजी आष्टी येथे नियोजित करण्यात आली असून परीक्षेसाठी प्रशासनाने सर्व तयारी पूर्ण केली असल्याची माहिती उपविभागीय अधिकारी श्रीमती वसीमा शेख यांनी दिली. परीक्षा पारदर्शक, शिस्तबद्ध आणि सुरळीत वातावरणात पार पडावी यासाठी आवश्यक नियोजन करण्यात आले आहे. यंदाच्या भरती प्रक्रियेस आष्टी व पाटोदा या दोन्ही तालुक्यांतून एकूण २१०८ उमेदवार पात्र ठरले आहेत. त्यापैकी पाटोदा तालुक्यातील ८७० तर आष्टी तालुक्यातील ११३० उमेदवार परीक्षेला

पान २ वर

# आपल्या प्रगतीत दुसऱ्याचा विचार म्हणजे अंत्योदय–प्रकाश पाठक

## सावरकर महाविद्यालयात 'एकात्म मानवदर्शन'



बीड (प्रतिनिधी) समाजातील सामान्य माणसाला उभे करणे, आपल्या प्रगतीत दुसऱ्यांचा विचार म्हणजे अंत्योदय आहे असे प्रतिपादन स्वामी विवेकानंद केंद्राचे सहसंचालक प्रकाश पाठक यांनी केले. येथील स्वा.सावरकर महाविद्यालयाच्या वतीने आयोजित 'एकात्म मानवदर्शन' संगोष्टीच्या उदघाटन प्रसंगी ते बोलत होते. व्यासपीठावर भारतीय शिक्षण प्रसारक संस्थेचे अध्यक्ष डॉ. सुरेंद्र आलूरकर, कार्यवाह डॉ. हेमंत वैद्य, कृषी विज्ञान केंद्राचे प्रकल्प संचालक डॉ.उपेंद्र कुलकर्णी, महाविद्यालय विकास समितीचे अध्यक्ष प्रा. चंद्रकांत मुळे, प्राचार्य डॉ. सुहास मोराळे, सांगोष्टीचे निमंत्रक डॉ.हंसराज जोशी, आयोजन सचिव डॉ.अनंत देशपांडे यांची उपस्थिती होती. पुढे बोलताना बिजभाषक प्रकाश पाठक म्हणाले की दीनदयालजींनी मानवी कल्याणाचा विचार मांडला. शरीर, मन, बुद्धी आत्मा यांचा एकत्रित विचार त्यांनी मांडला. निसर्गाचा ऱ्हास करून प्रगतीची संकल्पना मांडणे चुकीचे आहे. साम्यवाद आणि भांडवलशाही मानवी कल्याण करू शकत नाहीत. जगाच्या कल्याणासाठी आपल्या समृद्ध परंपरेतून आलेला एकात्म मानवदर्शन हाच विचार सर्वांना पुढे नेणार आहे असे भारतीय विचारांचे चिंतन दीनदयाळ उपाध्याय यांनी केले. अध्यक्षीय समारोप करताना डॉ. सुरेंद्र आलूरकर म्हणाले शाश्वत विकास साधायचा असेल तर एकात्म मानवदर्शन हाच एकमेव उत्तम पर्याय आहे. याचा स्वीकार सर्वांनी करावा. विश्वाच्या कल्याणाचे हे तत्त्वज्ञान आहे. कार्यक्रमाचे प्रास्ताविक महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.सुहास मोराळे यांनी केले. उद्घाटन कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. रूपाली कुलकर्णी यांनी केले. या प्रसंगी 'एकात्म मानवदर्शन' सांगोष्टीच्या निमित्याने तयार करण्यात आलेल्या दोन पुस्तकांचे प्रकाशन

पान २ वर

# प्रथम घोडके यांनी केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या परीक्षा उत्तीर्ण होण्याचे ध्येय ठेवावे-आ.धस




आष्टी (प्रतिनिधी):-आष्टी येथील प्रथम बाळासाहेब घोडके यांची महाराष्ट्र लोकसेवा आयोग स्पर्धा परीक्षा अंतर्गत कृषी उपसंचालक वर्ग-१ पदी निवड झालीच आहे परंतु यापुढे त्यांनी केंद्रीय लोकसेवा आयोगातील स्पर्धा परीक्षा देऊन जिल्हाधिकारी, जिल्हा पोलीस प्रमुख या पदी निवड व्हावी असे ध्येय ठेवावे असे आवाहन आमदार सुरेश धस यांनी केले आष्टी येथील नगरसेवक बाळासाहेब घोडके यांचा मुलगा प्रथम बाळासाहेब घोडके याची महाराष्ट्र लोकसेवा आयोग अंतर्गत कृषी उपसंचालक होणे निवड झाल्याबद्दल आष्टी येथील नागरी सत्कारामध्ये प्रमुख मार्गदर्शन करताना ते बोलत होते यावेळी व्यासपीठावर श्रीधरपंत सहस्त्रबुद्धे, सरपंच परिषद मुंबई महाराष्ट्राचे प्रदेशाध्यक्ष दत्ताभाऊ

पान २ वर

CMYK